म. ग्रं. सं. ठाणे

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक

पुस्तकाचें नांव

सन

# विक्रमोर्वशीनाटक.

ह्या संस्कृत नाटकाचें मराठी भाषांतर

कृष्णशास्त्री राजवाडे.

ह्यांनीं केलें

तें

पुणेयेथें

सुविद्याप्रकाश

छापखान्यांत छापिलें

शकें १७९६.

सन १८७४.

---

किंमत ॥। आणे.

सन १८४७ चा आक्ट २० व सन

१८६७ चा अक्ट २५ प्रमाणें रजिस्टर

केलें असे.

# प्रस्तावना.

गीर्वाण भाषाही कोणत्याही भाषेच्या भूषणाची पेटीच होय ह्या भाषेंत रस, गुण आणि अलंकार अनेक आहेत त्या योगानें ही वाचणाऱ्यास परमाल्हाददायक आहे, या भाषेप्रमाणें आनंद देणारी दुसरी भाषा थोडींच असें विद्वानास माहीत आहेच.

ही भषा गद्य पद्यात्मक कविता रूपानें रासिकांस परमाल्हाद देते कारण मोकळ्या वाक्या पेक्षा कविते पासून आल्हाद फार होत असतो जसी दोष रहित उत्तम नायिका रस, भाव, गुण आणि अलंकार यांच्या योगानें अंतःकरणास परमाल्हाद देते तशी दोष रहित कविता शृंगारादिक रस, प्रसादाक गुण इत्यादिक भाव आणि उपमादिक अलंकार यांच्या योगाने अंतःकरणास परमाल्हाद देते.

कविता एक रमणीच होय, शद्ब आणि अर्थ हे तिची मूर्ति, रसादि व्यंग्य हें तिचें जीवित आणि उपमादिक अलंकार हे हारादिकासारखे होत असें प्रताप रूद्रांत सांगितलें आहे.

कविता रूपानें भाषेचा परिणाम झाला असतां तिला गोडी फार येते, ती गोडी आणणें ही उत्तम कवीची शक्ती आहे पहा, कालीदास, भवभूति, भोज, दंडी, बाण आणि श्रीहर्ष इत्यादिकांच्या कवितेंत जी असाधारण गोडी दिसतें ती त्या कवींची शक्तीच होय त्या सर्व कवींमध्यें कालिदास हा मुकुट मणिच होय. त्याच्या महत्वा विषयीं असा एक श्लोक आहेकीं; पुरा कवीनां गणना प्रसंगे कनिष्ठिकाधिष्टितकालिदासा ॥ अद्यापि ततुल्यकवेरभावा दनामिका सार्थक नामधेया ॥ १ ॥ अर्थ—पूर्वी सर्व कवींच्या गणना प्रसंगीं प्रथमांगुलीनें कालिदासाची गणना केली अनंतर त्याच्या बरोबरीचा दुसरा कवि दुसऱ्या अंगुलीनें गणावा तर तसा कोणीच नाही ह्मणून दुसऱ्या अंगुलीचें नांव अनामिका पडलें हे यथार्थच आहे.

कालिदासानें शकुंतला नाटक, विक्रमोर्वशी नाटक, मालविकाग्निमित्र नाटक आणि हास्यार्णव नाटक अशीं चार नाटकें केलीं आहेत त्यांमध्यें शकुंतला नाटकांत तर त्या कवीनें केवळ रस ओतला आहे त्याचा अनुभव सर्व रसिकजनांस आहेच हा कवि बहुतेक संकृत विद्वानास अत्यंत मान्य आहे त्या कवींने केलेले जें विक्रमोर्वशी नाठक त्यांचे हे मराठी भाषांतर करून सांप्रत विद्वज्जनास सादर केलें आहे.

ह्या नाटकांत धीरोदात्त नायक, संभोग आणि विप्रलंभ असा उभय विध शृंगाररस प्रधान आहे आणि करुण रस अंगभूत आहे, प्रसंगानुरूप इतर रसही सूचित आहेत.

भाषांतर ह्मटलें ह्मणजे मूळ ग्रंथाहून भाषांतरांत न्यूनाधिक होऊनये पण संस्कृतात थोड्या शद्बानीं बहुतार्थाचा संग्रह करितां येतो तसा भाषांतरांत संग्रह करितां येत नांहीं तथापि मूळाचा अर्थ न सुटतां अधिकार्थाचा संग्रह कोठें कोठे केला आहे.

संस्कृतांतील रस मराठी भाषेत उतरणें कठीणच तशांत भाषांतर कर्त्याची शक्ती ही स्वल्प त्यां मुळें कांहीं दोष असतीलच तथापि जे विद्वान व रसिक असतात त्यांची गुण ग्रहणाविषयींच दृष्टि असते असे जाणून हा श्रम केला आहे.

आली कडे उदार सरकारानें नवीन ग्रंथ करणारांस यथा योग्य बक्षीस देण्याचें ठरविल्या पासून बहुतेक नवीन ग्रंथ होऊं लागले त्यांतिलच हा एक माझा उद्योग आहे.

या भाषांतरांत जे कठिन शद्ब आहेत त्या शब्दाचा अर्थ समजण्यासाठी खालीं टीपा घातल्या आहेत.

पूर्वीं सरकाराच्या आश्रयानें मी शांकुतल नाटक, मुद्राराक्षसनाटक, मालती माधव नाटक, वीरचरित्रनाटक, आणि विक्रमोर्वशी नाटक, पांचीं भाषांतरें केलीं आहेत तसेंच ऋतुवर्णन, सणाचें वर्णन, आणि गंगावर्णन ह्या विषयीं पद्यात्मक कविता केल्या आहेत त्या मेहेर्बान् कमीटीनें मान्य करून त्यां बद्दल बक्षिसेंही दिलीं आहेत त्यां पैकीं हें विक्रमोर्वशीनाटकांचें भाषांतर छापून प्रसिद्ध केलें आहे याचा संग्रह करण्याविषयीं जे विद्वान्, रसिक आणिं गुणग्राही आहेत ते आश्रय देतील अशी आशा आहे.

---

## ह्या नाटकांतील कथेचा सारांश.

उर्वशी नामक अप्सरा कैलासपर्वता पासून सखीसहवर्तमान स्वर्गास जात असतां मार्गांत केशी नामक दैत्यानें अडिविली तेव्हां सर्व अप्सरा ओरडल्या तो शद्ब सोमवशांतील पुरूरवस राजानें

सूर्योपस्थान करित असतां ऐकून अप्सरांस अभय दिलेंकीं, तुमच्या सखीस मी सोडवून आणतों तुह्मीं ह्या हेमकूट पर्वतावर बसा, मग तो राजा त्या दैत्याचा पराभव करून उर्वशीला घेऊन हेमकूट पर्वतावर आला, मग सर्वांच्या भेटी झाल्या आणि राजानें आपल्यास सोडवून आणल्यामुळें उर्वशीची राजावर पराकाष्ठेची प्रीति बसली. परस्पर आनंदांत आहेत तोंच इंद्राच्या आज्ञेनें चित्ररथ गंधर्व उर्वशीला सोडवून आणावयासाठी सेनेसहवर्तमान जात असतां पुरूरवस राजानें दैत्याचा पराभव करून ऊर्वशीला सोडविलें, अशी राजाची कीर्ती ऐकून हेमकूट पर्वतावर आला आणि परस्पराचें संभाषणादिक झाल्यावर राजास ह्मणाला, ज्या अर्थी उर्वशीला तूं सोडवून आणिलें त्या अर्थी तूंच उर्वशीला घेऊन इंद्राच्या दर्शनास चल. मग राजा ह्मणालाकीं, मला येण्यास अवसर नाहीं या करितां तूंच हिला घेऊन जां असें राजाचें वाक्य मान्य करून चित्ररथ उर्वशीस घेऊन स्वर्गास गेला तदनंतर राजा आणि उर्वशी परस्परांच्या वियोग व्यथेनें परस्परदर्शना साठीं उत्कंठित असतां उर्वशी सखी सह वर्तमान राजास येऊन भेठली मग परस्पर आनंदांत आहेत तों इंद्रा कडून उर्वशीस बोलावणें आलें म्हणून राजाचा निरोप घेऊन उर्वशी स्वर्गास गेली.

मग एक्या समयीं इंद्राच्या सभेंत नाटक चाल-

लें असतां त्यांत मेनकेनें वारुणीचें सोंग घेतलें हो तें आणि उर्वशीनें लक्ष्मीचें सोंग घेतलें होतें तेव्हां मेनकेनें उर्वशीस विचारिलेंकीं, अगे लक्ष्मी ह्या स. भेंत ब्रह्मादि देव बसले आहेत यां मध्यें तुझें मन कोणावर जातें मग उर्वशी रसावेशांत असतां तिच्या मुखातून माझें मन पुरुषोत्तमावर जातें अ. सें निघावें तें न निघता पुरूरव्यावर जाते असें नि घालें तेंव्हां तिच्या गुरूनें कोपाविष्ट होऊन तिला शाप दिलाकीं ज्या अर्थी “ माझ्या शिक्षेस तूं दोष आणिला त्या अर्थी तूं स्वर्गांतून भ्रष्ट होऊन मनुष्य लोकास जाशील ” हें ऐकून उर्वशीनें लज्जित हो- ऊन तोंड खालीं घातलें हें पाहून इंद्रानें तिजवर असा अनुग्रह केलाकीं, तुझें मन ज्यावर गेलें आहे तो राजा माझें रणांत साह्य करणारा आहे या क- रितां तूं भूमीवर जाऊन त्या राजास संतानाचा ला भ होईतों पर्यंत राहून स्वर्गास ये:

मग उर्वशी भूमीवर येऊन राजाजवळ इंद्राच्या आज्ञे प्रमाणें राहिली.

मग एक्या समयीं राजा उर्वशीसहवर्तमान वनविहार करावया करितां गंधमादन पर्वतावर गेला असतां मंदाकिनीच्या वाळवंटांत उदकवती नावाची विद्याधराची कन्या वाळूचे पर्वत करून क्रीडा करित होती तिजकडे राजानें न्याहाळून पा- हिलें ह्मणून उर्वशीस क्रोध आला, मग राजानें ...

नेक प्रकारें तिची समजूत केली, तरी ती शांतन होतां " ह्या अरण्यांत कोणी स्त्री येईल तर स्थावरत्व पावेल असा कार्तिक स्वामीचा जो शाप तो इंद्रसभेंत गुरूनें शाप दिला होतां त्यामुळें विसरून त्या अरण्यांत गेली तोंच लता झाली.

मग राजा तिच्या वियोगानें इतका वेडा झाला कीं, प्रत्येक झाडास, नद्यास, पर्वतांस, पशूंस आणि पक्ष्यांस उर्वशी उर्वशी करून विचारीत रानोरान फिरूं लागला तेव्हां त्याला अकस्मात् एक मणि सापडला तो त्यानें खालीं टाकिला तों इतक्यांत आकाशांतून असा शद्ब झालाकीं, " राजा हामणि पार्वतीच्या चरणाचा जोरंग त्यापासून झाला आहे याला संगमनयि मणि ह्मणतात, हा उचलूनघे हा तुझ्या हातांत असल्यानें तुझीय प्रिया तुला भेटेल असें ऐकून राजा तो मणि हातांत घेऊन एकालते जवळ येतांच त्यालतेंतून उर्वशी बाहेर निघाली मग राजा अत्यंत आनंद युक्त होऊन उर्वशी सहवर्तमान नगरात आला.

तदनंतर एक्यादिवसीं तो माणि करंडयांत घालून हिकडून तिकडे नेत असतां एका गृध्रानें करंडयाचे झाकण काढून मांसाच्या भ्रांतीनें तोंडांत धरून नेला तें वर्तमान ऐकून राजा धनुष्यास बाण लावतो तों इतक्यांत ज्यानें तोंडांत मणि धरिला आहे असा पक्षी आणि बाणखालीं पडतात हें पा

हून राजा बाण हातांत घेऊन त्यावरील अक्षरें वाचतो तीं असीं. पिता ऐल. माता जयाची विशुद्ध असे उर्वशी, जो कुमार प्रबुद्ध ॥ धनुष्मान् असें आयुनामा, तयाचा शर प्राणहर्ता समस्ताहितांचा ॥ १ ॥ इतक्यांत कोणी तापसी एक मुलगा घेऊन येऊन राजास ह्मणतेकी, हा मुलगा उपजतांच उर्वशीनें काहीं कारणास्तव च्यवनऋषीच्या आश्रमांत ठेविला नंतर त्या ऋषीनें क्षत्रियाचा जात कर्मादि विधि जसा करावा तसा या मुलाचा करून याला वेदांत आणि शास्त्रांत निपुण करून धनुर्विद्येंतही निपुण केलें आहे.

आज अन्यकुमारा सहवर्तमान पुष्पफलादिक अणावया करितां अरण्यांत जाऊन ज्याणें मुखांत मांसखंड धरलें आहे असा गृध्रवृक्षावरून बाणप्रहारानें खालीं पाडिला हें वर्तमान च्यवनऋषीस कळतांच त्याणी मला आज्ञा केलीकीं, हा उर्वशीचा मुलगा उर्वशीच्या स्वाधीनकर हें ऐकून राजानें त्या मुलाला सिंव्हासनावर घेतलें. मग उर्वशीसहवर्तमान मुलाला घेऊन राजा आनंदयुक्त होऊन ह्मणतोकीं. उर्वशी जसा इंद्र जयंतनामकपुत्राच्या योगानें धन्य आहे तसा मी ह्या पुत्राच्या योगानें धन्य आहें असें ऐकून उर्वशी ह्मणते महाराज, मी इतकावेळ आनंदांत होते पण आतां आपण इंद्राचें

नाव काढितांच "तुह्माला पुत्र होई पर्यंत तुमच्या जवळ मी असावें. अशी जी इंद्रानें मला आज्ञा केली तिचें स्मरण झालें आपला आणि माझा वियोग नव्हावाया साठींच हा मुलगा इतके दिवस मी च्यवन ऋषीच्या आश्रमांत ठेविला होता आतां आपला आणि माझा सहवास इतकाच हें ऐकतांच राजा मूर्छित होऊन पडला नंतर राजानें सावध होऊन असा निश्चय केलाकीं, पुत्रास राज्याभिषेक करून आपण अरण्यवास करावा. इतक्यांत इंद्रा कडून नारद येऊन ह्मणतांकीं, राजा, इंद्रानें तुला अशी आज्ञा केली आहेकीं, देव आणि दैत्ययांचा दारुण संग्राम होणार आहे आणि तूं रणशूर असून माझें साह्य करणारा आहेस या करितां त्वां शस्त्र त्याग करून अरण्यांत जाऊंनयें उर्वशी सहवर्तमान यावदायुष्य धर्माचरण करीत आपल्या नगरांतच असावे " मग काय पुसावयाचें " राजास आणि उर्वशीस पराकाष्टेचा आनंद झाला.

मग राजानें आपल्या पुत्रास राज्याभिषेक करून उर्वशीसहवर्तमान धर्माचरण करीत आनंदानें राहिला आणि नारदादिक सर्व हर्ष युक्त होऊन आप आपल्या स्थानास गेले.

# विक्रमोर्वशी नाटक.

## अंक १.

### पात्रें.

सूत्रधार .......... नाटक करणार माधवी.
नट .................. सोंगाडा.
अप्सरा ............ रंभा सहजन्या आणि मेनका.
राजा ................ पुरूरवा.
सारथी ..............
उर्वशी .............. अप्सरा.
चित्रलेखा ...... उर्वशीचीसखी.
चित्ररथ .......... गंधर्व.

## विक्रमोर्वशीनाटक.

प्रारंभ.

### अंक १.

मंगलाचरण.

श्लोक.

वेदांती ह्मणताति अद्वय[१] जया  
व्यापूनि जो राहतो ॥  
ज्याला ईश्वरशब्द सार्थ[२] इतरां  
जो लभ्य नाहींच तो ॥  
मोक्षेछू ह्रदयांत शोधिति जया  
जिंकोनि सर्वेंद्रियें ॥  
तो स्थाणू[३] दृढ भक्ति लभ्य तुमचीं ॥  
देवो समस्तं प्रियें ॥ १ ॥

(असें मंगलाचरण झाल्यावर सूत्रधार येतो)

सूत्र.—आतां फार लांबण कशास पाहिजे (पडद्या कडे पाहून) अरे मारिषा, ह्या सभेनें प्राचीन

१ एक २ अर्थसहित ३ शिव

कवीचे उत्तमोत्तम सरस ग्रंथ पाहिले आहेत आणि ही अत्यंत रसिक आहे ह्मणून कालिदासानें रचिलेलें जें विक्रमोर्वशी नामक नवीन नाटक त्याणें ह्या सभेचें रंजन करावें या करितां नट मंडळीस सांग कीं, आप आपलीं सोंगें घेण्यास सर्वांनीं तयार असावें.

नट.—(पडद्या बाहेर येऊन ह्म०) बरें आहे.

सूत्र.—मीं ह्या सभेंत मोठ मोठया रसिक जनांस हात जोडून विज्ञापना करितें आहें कीं,

आर्या.

प्रणयिजनप्रेमानें
अथवा सद्वस्तुसुबहुमानानें ॥
जनहो अवधानानें
ऐका ही कालिदासकृति कानें ॥२॥

(इतक्यांत पडद्यांत शब्द होतो)

श्रेष्ट जनहो सोडवाहो सोडवा ह्या संकटांतून.

---

१ हा नाटकाचा अभिनय कर्ता आमचा प्रणयि जन ह्मणजे मित्र आहे ह्मणून ह्याच्या वरील प्रेमानें २ नाटकांत ज्या वस्तूचें ह्मणजे प्रातिपाद्य वस्तूचे वर्णन करावयाचें आहे त्याच्या बहुमानानें.

सूत्र.—(ऐकून) अहो, कोणी विमानांत बसून आकाश मार्गानें जात आहेत त्यांचा हा दीन स्वर ऐकूं येत आहे, हें काय आहे बरें? (विचार करून) हां, समजलें.

श्लोक.

ऊरूपासुनि जाहली नरसखा[1]
नारायणाच्या अशी ॥
कैलासाधिप सेवुनी परततां
देवांगना उर्वशी ॥
देवांच्या रिपुनीं मधें अडविली
येवूनि, या कारणा ॥
देवस्त्री गण ओरडे त्वरित
हा इच्छी तिच्या रक्षणा ॥ ३ ॥

(तदनंतर अप्सरा पडद्या बाहेर येतात)

अप्सरा.—श्रेष्ठ जनहो, सोडवा हो सोडवा या संकटांतून जर कोणी देवांचा पक्षपाती असेल आणि कोणाची आकाशांत गति असेल तर.

---

१ शिवाची नृत्यानें सेवा करून.

(इतक्यांत पडदा वर करून राजा आणि त्याचा सारथी रथावर बसून पडद्या बाहेर येतात

राजा.—ओरडूं नका, मीं पुरूरवा राजा येथें आहें, माझें सूर्योपस्थान नुकतेंच समाप्त झालें आहे तर कोणा पासून तुम्हास सोडवावें तें माझ्या जवळ येऊन सांगा.

रंभा.—ह्या मेल्या असुराच्या उन्मादापासून.

राजा.—त्याणें तुमचा काय अपराध केला ?

रंभा.—ऐकावें महाराज, जी दुसऱ्याच्या तपा पासून भय पावणाऱ्या इंद्राचें सुकुमार आयुधच होय, जी सौंदर्याचा गर्व करणाऱ्या ज्या लक्ष्मी आणि पार्वती त्यांस खालीं पहावयाला लाव- णारी, जी स्वर्गाचें केवळ भूषणच, अशी आम- ची प्रियसखी, उर्वशी, चित्रलेखानामकसखी सह वर्तमान कुबेराच्या भवनांतून माघारी फि- रली तेव्हां अर्ध्या वाटेंत कोणीं असुरानें तिला धरिलें.

राजा.—तो अविचारी दुष्ट कोणत्या दिशेस गेला हें तुह्मास माहीत आहे काय ?

*अप्स.*—*ईशानी दिशेस.*

राजा.—बरें, तुह्मीं चिंता करूं नका, मीं तुमच्या सखीस आणावयाचा यत्न करितों.

अप्स.—(हर्षयुक्त होऊन) महाराज, सोमवंशांतील पुरुषास शरणागताचें त्राण करणें हें योग्यच आहे.

राजा.—तुह्मीं माझी वाट पहात कोठें बसाल ?

अप्स.—ह्या हेमकूट पर्वताच्या शिखरावर.

राजा.—हों, सारथे, त्वरेनें गेलें पाहिजे, इशानी दिशे कडे घोडे लवकर हांक.

सार.—आज्ञा महाराज, (असें बोलून घोडे हांकतो)

राजा.—(रथाचा वेग पाहून) शाबास सारथे, शाबास; आतां गरुड जरी माझ्या पुढें गेला असेल तरी त्यालाही ह्या रथाच्या वेगानें क्षणांत आटोपीन असें वाटतें.

श्लोक.

होतां चूर्ण, रथावरी उडति हे रेणूपरी कीं घन ॥
चक्राच्या भ्रमणें अरांतर[1] दिसे अन्या अरानीं घन[2] ॥
शोभे चाँमर[3] दीर्घ अश्वशिरिंहें चित्रापरी निश्चल ॥
मध्यस्थ ध्वजचैल[4] हें उडवितो प्रांतींच वेगानिल ॥ ४ ॥

(असें बोलून राजा आणि सारथी जातात)

सहजन्या.—सखि, राजर्षि गेला, आतां आपण ही त्याणें सांगितलेल्या ठिकाणीं जाऊन बसूं.

मेनका.—गड्ये, असेंच करूं (असें बोलून हेमकूट पर्वताच्या शिखरावर आरोहण केल्या सारखें करतात.)

रंभा.—तो राजर्षि आमच्या हृदयांतील हें शल्य उपडून काढील काय ?

---

१ दुसऱ्या अरा २ सांद्र ३ चवरी ४ वस्त्र.

मेन.—सखि, या विषयीं तुला संशय नसावा.

रंभा.—दुसरें काहीं नाहीं, पण ते दान व फार दुर्जेय आहेत या मुळें संशय.

मेन.—महेंद्र देखील रणप्रसंग प्राप्त झाला असतां ह्या राजास भूलोकांतून बहुमान पूर्वक बोलावून देवास जय मिळावया साठीं सेनेच्या अग्र भागीं ह्या राजाचीच योजना करीत असतो.

रंभा.—अगे दुसरें काहीं नाहीं त्याचा जय होवो ह्मणजे झालें.

मेन.—(क्षणभर उगीच राहून) सख्यानो, घाबरूं नका स्वस्थ असा ज्याच्या ध्वजावर हरिणाचें चिन्ह आहे असा हा सोमदत्तसंज्ञक त्या राजाचा रथ दिसत आहे, हा राजा कार्य केल्यावांचून कधीं मागें फिरणार नाहीं असें मला वाटतें. (कांहीं शुभसूचक शकुन झाला असें दर्शवून पहात उभ्या रहातात) तदनंतर राजा सारथी आणि चित्रलेखेनें जिचा हात धरिला आहे अशी उर्वशी येतात.)

चित्र.—सखि, घाबरूं नको, सावध हो.

राजा.—सुंदरि, घाबरूं नको, सावध हो.

साक्या.

असुरजनितभय गेलें सारें
इंद्राचा हा महिमा ॥
आहे त्रैलोक्याचा रक्षक
नाहीं तयास उपमा ॥ १ ॥
जैशी नलिनी उल्लासानें
उघडी नलिन निशांतीं[1] ॥
तैशी उघडीं भीरु नयन तूं
हर्ष धरूनि स्वांतीं ॥ २ ॥

चित्र.—बाई, काय करावें ? हिचे श्वासोच्छ्वास चालले आहेत इतक्यानें मात्र ही जीवंत आहे असें समजतें, पण ही अद्यापि सावध होत नाहीं

राजा.—तुझी सखी फारच भ्याली आहे, पहा.

आर्या.

भयकंप सोडिनाहा, हीच्या
कुसुमासमानहृदयाला ॥
स्तनवस्त्र जें हळुहळू, उडतें
तें सूचवी बहु, तयाला ॥ १ ॥

---

१ प्रातःकालीं.

(इतक्यांत उर्वशी सावध होते)

राजा.—(हर्षयुक्त होऊन) चित्रलेखे, तुझें भाग्य मोठें आहे, कांकीं, तुझी सखी सावध झाली पहा.

साक्या.

उदया येतां विधु[1], तिमिरें जशि
विरहित रात्री दिसती ॥
जैशी विधूम अग्निज्वाला रात्रीं
तेजें स्फुरती ॥ १ ॥
तैशी वरतनु मोहानें ही
त्यजितां प्रसन्न आहे ॥
प्रथम कलुष[2], तटपातें, मग
जशि गंगा निर्मल वाहे ॥ २ ॥

चित्र.—गड्ये उर्वशी, खरोखरीच सांगत्यें, भरवसा ठेव, शरणागतावर दया करणारे हे महाराज ह्याणीं देवांचे शत्रु जे दानव त्यांचा पराभव केला.

१ चंद्र २ गढूळ.

उर्व.—(डोळे उघडून) इंद्रानें दानवांपासून मला सोडिविलें काय ?

चित्र.—नाहीं नाहीं, इंद्रानें नाहीं पण इंद्रा सारखा ज्याचा पराक्रम अशा पुरूरव राजानें.

उर्व—(राजा कडे पाहून मनांत) तर मग ह्या दानवाच्या उन्मादानें मजवर मोठा उपकारच केला असें ह्मटलें पाहिजे.

राजा.—(उर्वशी कडे पाहून मनांत) जेव्हां नारायण ऋषीचें मोहन करण्या साठीं सर्व अप्सरा प्रवृत्त झाल्या तेव्हां त्याच्या मांडीपासून ही उत्पन्नझाली, हीच्या सौंदर्यास पाहून सर्व अप्सरा लज्जित झाल्या असें ऐकतों, हें युक्तच आहे अथवा मला असें वाटतें कीं, हिला त्या तपस्व्यानें उत्पन्न केलें नाहीं कारण.

श्लोक.

वाटे देउनियां हिला स्वरुचि
तें निर्मीशशी, कीं स्मर ॥
श्रृंगारैकवपू[1] हिला उपजवी
कीं रम्य पुष्पाकर[2] ॥

---

१ श्रृंगार रस हेंच ज्यांचें वपु ह्मणजे शरीर २ वसंत.

कांकीं, वेदजडास ज्यास विष
यीं गोडी कशाची, असा ॥
निर्मायास शकेल वृद्ध मुनितो
ऐशा स्वरूपा कसा ॥ १ ॥

उर्व.—अगे चित्रलेखे, माझ्या मैत्रिणी कोठें असतील बरें ?

चित्र.— आह्मास काय ठाऊक ? अभय देणारे हे महाराज आहेत ह्यांस विदित असेल.

राजा.—(उर्वशी कडे पाहून) तुझ्या मैत्रिणी मोठ्या खेदांत आहेत तूंच विचार करून पहा बरें.

श्लोक.

ज्याच्या दृष्टिपथास दैवगति
नें तूं पावशी एकदा ॥
तोही होत असे समुत्सुक
तुझ्या वांचूनिया सर्वदा ॥
ज्याचें प्रेम तुझ्यावरी, तुज
विणे ज्याला गमेना, असा ॥
तो, तूझ्या विरहें सखीजन
तुझा दुःखी न होई कसा ॥

२ नारायण.

उर्व.—(मनांत) हें भाषण केवळ अमृतच होय. अथवा चंद्रापासून अमृत उत्पन्न होतें यांत आश्चर्य काय.

(उघडपणानें) महाराज, ह्मणूनच माझ्या मनास त्यांची इतकी उत्कंठा लागली आहे.

राजा.—(हतानें दाखवून)

श्लोक.

हेमकूटगत ह्या तुझ्या सखी
पाहती मुख तुझें[1] लसन्मुखी ॥
राहुमुक्त शशितें जसे जन
पाहताति बहु उ[2]त्कलोचन ॥ १ ॥

उर्व.—(अभिमानानें पहाते)

चित्र.—कां, सखी, मजकडे फारशी रोखून पहातेस

उर्व.—अगे, जो आपल्या सुखानें सुखी होणार आणि दुःखानें दुःखी होणार प्रियजन तो डोळ्यांनीं पाहिलाच पाहिजे.

---

१ जिचें मुख टवटवीत आहे २ उत्सुक

चित्र.—(किंचित् हसून) असा कोण तो ?

उर्व.—कोण ह्मणजे, आपला प्रियजन.

रंभा.—(हर्षानें पाहून मेनकेस ह्म०) हा राजर्षि चित्रलेखेसह वर्तमान आमच्या प्रियसखीस घेऊन हिकडेच येत आहे, अहाहा, हा विशाखे सहवर्तमान चंद्रच आला असें वाटतें.

मेन.—(न्याहाळून पाहून) ह्या दोन्ही गोष्टी आनंद कारक झाल्या, आमची प्रियसखी त्या दुष्ट दानवा पासून सोडवून आणिली ही एक गोष्ट, आणि हा राजा शरीरानें सुरक्षित आला, ही दुसरी.

सहज.—सखी, कां, दानव दुर्जय आहेत असें ह्मणत होतीस नां ?

राजा.—सारथे, हेंच तें हेमकूटपर्वताचें शिखर ह्यावर रथ उतरीव,

सूत.—आज्ञा महाराज, (असें बोलून रथ खाली उतरिवल्या सारखें करतो) (उर्वशी रथ खालीं उतरतानां आपलें आंग हदरल्या सारखें दाखवून भीतीनें राजास धरिते.)

राजा.—(मनांत) अहाहा, ह्या पर्वतप्रदेशावर माझ्या उतरण्याचें साफल्य झालें.

साक्या.

थडकत रथ हा उतरत असतां
हरिणाक्षीनें केला ॥
स्पर्श, तयानें माझ्या आंगीं
रोमांचोद्गमठेला ॥ १ ॥
जाणों मदंतरंगीं अनंग उद्भ
वतां, वरि त्याचे ॥
सर्वांगावरि अंकुरउगवुनि सांद्र
पसरले सांचे ॥ २ ॥

उर्व.—(लाजून) गड्ये, अंमळ एकीकडेसरपण.

चित्र.—नाही बाई, माझ्यानें नाही सरवत.

रंभा.—गड्यानों, हे राजर्षि अशा प्रकारचें आमचें प्रियकरणारें आहेत, या करितां आपण ह्यांचा सत्कार केला पाहिजे.

अप्सर.—बरें आहें, असेंच केलें पाहिजे. (असें बोलून राजा जवळ जातात.)

राजा.—सारथे, रथ उभाकर.

श्लोक.

ही सुंदरी उत्सुक फार झाली
तैशा हिच्या उत्सुक होत आली ॥
जैशी ऋतुश्री मिळते लताशीं
तैशी मिळोही अपुल्या सखींशीं ॥ १ ॥

सूत.—आज्ञा महाराज, (असें बोलून रथ उभा करतो

अप्सरा.—आज महाराजांचा विजय झाला ही गोष्ट मोठी आनंदाची आहे,

राजा.—तुह्माला तुमच्या सखींची भेट झाली हें ही तसेंच आहे.

उर्व.—(चित्रलेखेचा हात धरून रथाखालीं उतरून) सख्यानो मला कडकडून भेटा, कारण, माझ्या सखींची आणि माझी पुन्हा भेट होईल अशी मला आशा नव्हती. (साऱ्या सख्या उर्वशीस भेटतात.)

मेन.—(आशीर्वाद पूर्वक) महाराजानीं असेंच सर्व काळ पृथ्वीचें पालन करीत चिरकाळ असावें.

सूत.—महाराज, हा पूर्वे कडे अत्यंत उंच रथाचा ध्वज दिसत आहे यावरून असें वाटतें कीं.

श्लोक.

गगनांतूनि हा कोणी,
तप्त[१]चामीकरांगद ॥
उतरे, पर्वतीं जैसा,
विजेनें युक्त तोयद ॥ १ ॥

अप्सरा.—अहाहा, काय चमत्कार, हा चित्ररथ गंधर्व आला (तदनंतर चित्ररथ गंधर्व येतो)

चित्र.—(राजाजवळ येऊन) राजा, निरंतर पूर्ण जो प्रताप त्याणें वृद्धिंगत असा तूं मोटा भाग्य वान् आहेस.

राजा.—काय, कोण गंधर्व राज, (रथाखालीं उतरून प्रियमित्राचें स्वागत असो.

(राजा आणि चित्ररथ परस्परांचा हात धरतात)

चित्र.—मित्रा, केशीदैत्यानें उर्वशीचा अपहार केला

१ तप्त जें सुवर्ण त्यांचीं बाहु भूषणें ज्यास आहेत.

हें ऐकून तिला सोडवून आणावया करितां इंद्रानें गंधर्वांच्या सेनेस आज्ञा केली, तदनंतर विमानांत बसून संचार करणारे जे देव त्यांपासून तुझा.

आर्या.

ऐकुनि राशि यशाचा, जाणुनि
आलों इथें तुझ्या स्थितिला ॥
पुरुहूतदर्शना तूं, आतां
घेवूनि शीघ्रचाल हिला ॥ १ ॥

शाबास, राजा शाबास, त्वां इंद्राचें मोठें प्रियकार्य केलें, पहा.

आर्या.

नारायण मुनिनें ही, इंद्राला
अर्पिलीअसे मागें ॥
अरिहस्तांतुनि आणुनि, आतां
सुत्हृदें तुवां महा भागें ॥ १ ॥

राजा.—छेछे, मित्रा, असें बोलुं नको.

श्लोक.

हा तों प्रताप सगळा अमरेश्वराचा
तत्पक्षपाति करिती जयजो पराचा ॥
सिंहप्रतिध्वनिच होउनि गव्हरांत
चोहीं कडेहि पसरोनि करी गजांत ॥ १ ॥

चित्र.—राजा, तूं ह्मणतोस हें योग्यच आहे. कारण, गर्व न करणें हें पराक्रमास भूषणच होय.

राजा.—मित्रा, इंद्राच्या दर्शनास येण्यास आतां अवसर नाहीं या करितां तूंच हिला घेऊन त्याज कडे पोहचवून दे.

चित्र.—जसें तुला बरें दिसेल तसें. (असें बोलून अप्सरांस ह्म०) चला मजबरोबर. (सर्व जावयास निघतात)

उर्व.—(सखीजवळ) गड्यें, महाराजानीं आह्मावर मोठा उपकार केला आहे, ह्मणून त्यांस विचारिल्या वांचून जाणें योग्य नाहीं, पण बाई कसें करावें? माझ्यानें त्यांच्या समोर उभें राहून बोलवत नाहीं, या करितां तूंच माझें मुख हो.

चित्र.—(राजाजवळ येऊन) महाराज, उर्वशी वि-

ज्ञप्ति करित आहेकीं, मीं महाराजांची अभ्यनुज्ञा घेऊन "जशी केवळ महाराजांची प्रियरमणीच अशी कीर्ति देवलोकास न्यावयास इच्छित्यें.

राजा.—उत्तम आहे, जावें परंतु लवकर पुन्हा दर्शन द्यावें.

(गंधर्वांसहवर्तमान आकाशांत गमन करितात)

उर्व.—(जातानां अडखळल्या सारखें करून) काय हें आश्चर्य? माझ्या गळ्यांतील माळलतेच्या शाखेस अडकली, आतां काय करावें? (असें मिष करून जवळ येऊन राजाकडे पहाते आणि सखीला ह्म०) गड्यें, चित्रलेखे, माझी माळ सोडीव बरें.

चित्र.—(पाहून आणि हसून) काय तरी बाई, ही माळ फारच बळकट अडकली आहे, ही माझ्यानें सुटणें कठीण.

उर्व—पुरे गड्यें, तुझी सारी थट्टाच, अगोदर ही सोडीव ह्मणजे झालें.

चित्र.—मला तर वाटतें कीं, ही सुटण्या सारखी अडकली नाहीं. तथापि सुटेल तर पहात्यें.

उर्व.—(किंचित् हास्य करून) तुला ह्या बोलण्याचें पक्कें स्मरण असूंदे बरें.

श्लोक.

राजा.—गतीला हीच्या तूं क्षण करुनि
यां विघ्न लतिके
बहू केलें माझें प्रिय, ह्मणसि
तें काय ? अइके ॥
तुझ्यां योगें मागें मुख वळवु
नी ही सुनयना
पुन्हाही जातां मीं अजि निर
खिली हास्यवदना ॥ १ ॥

चित्र.—(माळ सोडिवते)

उर्व.—(राजा कडे पहात उसासा टाकून आकाशांत वर जाणाऱ्या सखीस पहाते)

सूत.—आयुष्मन्,

आर्या.

ज्याणीं देवेंद्राचा, केला अप
राध, दैत्य ते प्रबळ ॥
- - - - - - - - - - - - - - -

मारुनि फेकुनि दिधले, जेणें
लवणांबुधीमधें सकळ ॥ १ ॥
तें वायव्यास्त्र तुझ्या, शिरलें
भात्यांत आणखी हि पहा ॥
शिरतो बिळांत जैसा, वेगें येवो
नियां भुजंग महा ॥ २ ॥

राजा.—तर मग रथ तयार कर ह्मणजे मी रथारूढ होतो. (सारथी रथ तयार करतो)

राजा.—(रथावर आरूढ होतो)

उर्व.—(उत्कंठा पूर्वक राजाकडे पाहून मनांत) असा उपकारी जो राजा ह्याचें दर्शन पुन्हा मला होईल काय ? (असें बोलून गंधर्व आणि सखी ह्यां सहवर्तमान जाते)

राजा.—(उर्वशीच्या मार्गा कडे पाहून) काय सांगावें हो ! ह्या मदनाची रीति कांहीं चमत्कारिकच आहे, पहा. जो कोणी ह्याच्या स्वाधीन झाला तो दुर्लभ वस्तूचीही इछाकरीत असतो.

साक्या.

निजजनकाच्या[1] मध्यम पदांत[2]
जातां सुरांगना हे ॥
बळें शरीरापासुनि माझ्या
मनास ओढित आहे ॥ १ ॥
ज्यापरि हंसी भंगुनि कोमल
नालाच्या अग्रातें ॥
सूत्र तयांतुनि काढुनि ओढुनि
घेउनि जायनभातें[3] ॥

(असें बोलून सर्व जातात)

(प्रथम अंक समाप्त)

१ आपला जनक जो नारायण त्याचा. २ मध्यम पदांत ह्मणजे अकाशांत ३ आकाशातें.

# विक्रमोर्वशी नाटक.

## अंक २.

### पात्रें.

विदू ................. हास्य रस प्रधान राजाचा मित्र
चेटी ................. दासी.
राजा ................. पुरूरवा.
चित्रलेखा .... उर्वशीचीसखी.
उर्वशी ............ अप्सरा.
राणी ...... ..

# विक्रमोर्वशीनाटक.

## प्रारंभ.

## अंक २.

(तदनंतर विदूषक येतो)

विदू.—(गडबडीनें) अरे निमंत्रणका, जसें परमान्न[1] किती ही गुप्त ठेविलें तरी त्याचा वास बाहेर पडतो तसें हें राज रहस्य बाहेर प्रगट झालें आहे, या मुळें जो तो मला पुसणार, तेव्हां मीं जिव्हा आवरून कोठवर धरावी ह्मणून राजा कचेरींतून येई तों पर्यंत मीं ह्या देवछंद नामक प्रासादावर निवांत बसतों, तेथें लोकांची दाटी ही नाहीं.

(तदनंतर चेटी येते)

चेटी.—काशी राजाची कन्या अशी जी राणी तिणें मला आज्ञा केली आहे कीं " आमचे महाराज ज्या दिवसा पासून सूर्योपस्थान करून माघारीं

---

१ खीर

फिरले त्या दिवसापासून त्यांचें मन उदास झा-ल्या सारखें दिसतें या करितां कोणाच्या उत्कंठे-नें महाराजांचें मन इतकें उदास झालें आहे हें माणवक भटजी पासून हळूंच काढून घे ह्मणून, तर मग आतां त्या भटुरग्या पासून हें वर्तमान बाहेर पडण्याची युक्ति काय करावी बरें ? अथ-वा त्याचा विचार कशास पाहिजे ? तो इतका हलका आहे कीं जसा तृणावर पडलेला दहि वराचा बिंदु एक क्षणभर देखील ठरत नसतो तसें हें राजरहस्य त्याच्या तोंडांत क्षणभर ठर-णार नाहीं असो, आतां मीं त्याचाच शोध करत्यें. (इकडे तिकडे फिरून आणि पाहून) अहाहा, कायतरी मेलें हें सोंग. जसें चित्रांती-ल माकडच. तसा हा माणवक आपणाशींच कांहीं तरी पुटपुट करीत एकी कडें बसला आहे, ह्याच्या जवळ जात्यें (असें बोलून पुढें येऊन) भटजी वा, मीं नमस्कार करित्यें.

बिदू.—गो, तुझें कल्याण असो. (मनांत) ह्या दुष्ट दासीला पाहून तें राज रहस्यपोट फोडून जसें कां बाहेरच निघत आहे असें वाटतें. (उघड पणानें) अगे निपुणिके, तूं आपला गाण्याचा उद्योग सोडून कोठें जात आहेस ?

चेटी.—भटजीबावा, राणी साहेबांच्या आज्ञेनें आपणांसच पहावयास.

विदू.—राणी साहेबांची काय आज्ञा आहे ?

चेटी.—राणी साहेबांचे ह्मणणें आहेकीं, आलीकडे महाराजांचें मन मजकडे अगदीं नाहीं असें वाटतें, कारण मीं विरहदुःखानें अशी दुःखित असतां महाराज मजकडे लक्ष्य देत नाहींत.

विदू.—निपुणिके, माझ्या प्रिय मित्रानें राणी साहेबांच्या मनांस दुःख प्रद असें कांहीं आचरण केलें काय ?

चेटी.—महाराजांस जिची उत्कंठा लागली आहे त्या स्त्रीच्या नावानें महाराजानीं राणी साहेबांस हाक मारिली.

विदू.—(मनांत) राजा इतका दक्ष असून त्याच्या मुखांतून देखील रहस्य गोष्ठ बाहेर पडली, मग मीं तर बोलून चालून ब्राह्मणच, माझ्यानें जिव्हा धरिली जाईल काय ? (उघडपणानें) होय खरेंच, उर्वशीनामक अप्सरेला पाहिल्या पासून राजा अगदीं वेड्या सारखा झाला आहे, आणि

तो केवळ राणीलाच पीडा देतो असें नाहीं, बिचाऱ्या मला ब्राह्मणाला ही पीडा देत आहे. त्यामुळें मला खाणें ना पिणें.

चेटी.—(मनांत) वाहवा, मीं महाराजाचें रहस्य ह्या कोणी एक किल्लाच फोडिला.

आतां येथून जाऊन हें वर्तमान राणीसाहेबांस निवेदन करत्यें. (असें बोलून जावयास निघतें)

विदू.—निपुणिके, राणी साहेबांस असा निरोप सांगकीं, महाराजांस ह्या मृगतृष्णे पासून माघारीं फिरवितां फिरवितां मीं तर दमलों, पण जर तुझें मुखकमल पाहील तर वाटेवर येईल असें वाटतें.

चेटी.—तुमच्या आज्ञें प्रमाणें राणीसाहेबांस सांगत्यें (असें बोलून चेटी जाते) (इतक्यांत पडद्यांत स्तुति पाठक स्तुति करतो) महाराजाचा जयजयकार असो.

श्लोक.

सूर्याची अणखी तुझी अधि
कृती तुल्याचि भासे अह्मा ॥

---

१ अधिकार.

नाशाया तमसर्व एकचि असे
उद्योग दोघां तुझां ॥
मध्यान्हीं क्षण मात्र सूर्य गग
नीं विश्रांति घेतो जसा ॥
विश्रांती दिनषष्ठभागसमयीं
घेतोसतूंही तसा ॥ ३ ॥

विदू.—(कान देऊन) हा माझा प्रियमित्र कचेरींतून उठून इकडेंच येत आहे, तर मी त्याकडेसच जातों (असें बोलून जातो (तदनंतर उत्कंठायुक्त राजा आणि विदूषक येतात)

आर्या.

राजा—देवस्त्री ती दृष्टी पडल्यापासु
नि अनंगबाणानें ॥
कृतमार्गीमतत्व्हदयीं शिरली
मित्रा अमोघपातानें ॥

विदू.—ती तुझ्या व्हहयांत शिरली, पण त्या बिचाऱ्या राणीला पीडा झाली आहेना ?

राजा.—(विदूषकाकडे पाहून) अरे, तिला हें वृत्त कसें कळलें ? हें माझें रहस्य तूं तर फोडिलें नाहींनॉ ?

विदू.—(मनांत) ही गोष्ट राजापासून फुटली नसून तो रांडलेक निपुणिका तिणें ही कल्पित कादंबरी करून मला फशिवलें, असें वाटतें, नाहीं तर माझा प्रिय मित्र मला असें न विचारिता.

राजा.—कारे, आतां उत्तर देत नाहींस ?

विदू.—पहा बाबा, मीं आपलें तोंड इतकें गच्च दाबून धरलें आहे कीं, मजपासून तुलाही उत्तर मिळावयाचें नाहीं.

राजा.—ठीक आहे असेंच केलें पाहिजे, पण मित्रा, आतां हें माझें मन कशानें स्वस्थ होईल बरें ?

विदू.—चला, आतां स्वयपाक घरांत जाऊं;

राजा—तेथें काय आहे ?

विदू.—तेथें सर्व भक्षणीय पदार्थ भरले आहेत. त्यांतील लाडू मोदक खाऊन मन स्वस्थ होईल

राजा.—अरे पोटया, तेथें मनांस वाटतील तेते पदार्थ खाऊन तुझें मन स्वस्थ होईल, पण मला जें वस्तु पाहिजे तें दुर्लभ आहे त्यावाचून माझें मन कसें स्वस्थ होईल ?

विदू.—पण मीं तुला असें विचारितोंकीं, त्या उर्वशीनें तुला पाहिलें आहेनां ?

राजा.—मग, पाहिलें ह्मणून काय झालें ?

विदू.—या वरून ती तुला दुर्लभ नाहीं असें माझ्या तर्कांत येतें.

राजा.—बाबारे, ह्या लोकांत तिच्या रूपाशीं मिळा वया जोगी जोडी नाहीं.

विदू.—जोडी नाहीं ह्मणजे, अरे मींच तिच्यारूपाला जोडी आहे.

राजा.—अहा काय मदनाचा पुतळा, जशी दृष्टच लागेल. अरे मीं तिच्या प्रत्येक अवयवाचें वर्णन केलें ह्मणजे तुला समजेल थोडक्यांत सांगतों ऐक.

विदू.—हों, सांगा. मीं अगदीं एकाग्रचित्त करून बसलों आहें.

साक्या.

राजा.—विभूषणाचें भूषण किंवा शोभे
ची ही शोभा ॥

लावण्याचें लावण्यचि कीं,
इंदुकलेचा गाभा ॥ १ ॥
त्रैलोक्यांतिल उपमानाचें
प्रत्युपमानचितीचें ॥
अंग, दृष्टिला पडल्यापासुनि
गेलें भान मतीचें ॥ २ ॥

विदू.—हें मला असें वाटतेंकीं, मृगजळाची कांहीं गोडी अधिक मानून चातकानें त्याची आशा धरून बसावें तसें तूं दिव्य स्त्रीचें लावण्य मानून तिची आशा धरून बसला आहेस.

राजा.—मित्रा. अनेक शीतोपचार केल्यावांचून माझें संतापशमन व्हावयाचें नाहीं या करितां आतां प्रमदवनांत चल.

विदू.—(मनांत) काय करावें ? गेलें पाहिजे. (उघडपणानें) इकडें यावें महाराज, (असें बोलून इकडे तिकडे फिरतात) मित्रा, हा प्रमदवनाचा प्रदेश आहे असें ह्या दक्षिणे कडील वायूनें समजतें.

राजा.—ह्यावायूला दक्षिण हें विशेषण योग्य आहे पहा.

श्लोक.

श्रीशीं वसंतऋतुच्या रममाण होतो।
उल्लास कुंदलतिकेसहि पूर्ण देतो ॥
स्नेहें अणीक समदृष्टिपणें तसाच
वाटे मला रसिक कामुकसाच साच ॥ १ ॥

विदू.—हॉं, असेंच वेड लागो असो, (असें बोलून इकडे तिकडे फिरून) महाराज, ह्या प्रमदवनांत प्रवेश करावा.

राजा.–तूं पुढें चल (असें बोलून दोघे आंत शिरतात.)

राजा.–(भय युक्त होऊन) मित्रा प्रमदवनांत गेलों असतां माझी व्यथा खचित दूर होईल असें मला वाटत होतें पण उलटें झालें,

श्लोक.

मीं इछितों आंत शिरावयाला
बागेंत ज्या ताप सरावयाला ॥

ती ताप दे फार, नदी समोर
जोपोहतो त्या प्रति जेविघोर ॥ १ ॥

विदू.-हें कसें बरें ?

साक्या.

राजा.—दुर्लभ वस्तूतें इच्छी हें मन
माझें अनिवार ॥
पंचशरानें प्रथमचि केलें क्षीण
असे तें फार ॥ १ ॥
मलयगिरीच्या वातें विपत्र
आम्रपांक्ति ही दावी ॥
अशांत नूतन अंकुर,
अतां पीडा किती वढावी ॥ २ ॥

विदू.-पुरे आतां, किती विलाप करशील, तुझ्या इष्टसंपादनास कारणभूत कामच होय तो तुझें सहाय्य करील.

राजा.—तथास्तु, ब्राह्मणाच्या वाक्याचा मीं अंगीकार केला (असें बोलून हिकडे तिकडे फिरतो).

विदू.-महाराज वसंत ऋतूचा प्रादुर्भाव ज्यांत झाला आहे अशा ह्या प्रमदवनाचें रमणीयत्व पहा.

राजा.—अरे, हें मीं प्रतिपदीं पहातच आहें येथें.

श्लोक.

आरक्त स्त्रीनखाशीं सम कुरब[१]
क हें श्याम बाजूस दोन्हीं ॥
हें रक्ताशोक भेदोन्मुख[२], नवचि
पुढें. पाडि चित्तास मोहीं ॥
कांहीं कांहीं रजाचे कण धरिनव
ही मंजरी आम्रि आहे ॥
मौग्ध्यप्रौढीमध्यें[३] ही नयनसुख
मधुश्री सख्या होय पाहे ॥ १ ॥

विदू.—येथें मंडपाकार ही वासंतीलतेची जाळी आहे, हीमध्यें इंद्रनील मण्याचा हा चवरंग आहे. ह्या वर भ्रमराच्या संमर्दानें पुष्पें गळून पसरलीं आहेत, ह्मणून हा बाग सर्व सामग्री तयार करून तुमची वाटच पहातआहेकाय असा दिसत आहे. ह्मणून याजवर अनुग्रह करावा.

राजा.—बरें आहे, तुझ्या मर्जी प्रमाणे करूं (इकडे तिकडे फिरून दोघे चवरंगावर बसतात).

---

१ गुलाब २ विकासावस्थेंत आलेले ३ बाल्य आणि तारूण्य यांच्या मध्यें.

विदू--तूं येथें स्वस्थ बसून ह्या रम्यलतेकडे, नेत्र लावून उर्वशीविषयीं जी तुला उत्कंठा झाली आहे ती घालीव.

राजा—(श्वासोच्छ्वास टाकून).

श्लोक.

जरी पुष्पिता रम्यबागेंत वेली
ह्या सम्यां त्या कडे दृष्टि नेली ।।
तरी चक्षु हें तुष्ट नाहींच, तीच्या
स्वरूपेंचि जें मोहिलें सुंदरीच्या ॥ १ ॥

आतां ह्याला उपाय काय करावा ह्याचें चिंतन कर.

विदू—होय, चिंतन करतों, पण मी समाधि लावून चिंतन करित असतां तूं विलाप करून माझ्या समाधीचा भंग करूं नको ह्मणजे झालें (काहीं शुभ सूचक चिन्ह झालें असें सूचवून मनांत) वाहव्वा, मी कसा कार्यदर्शी आहे.

साक्या.

पूर्णसुधाकरमुखी मलातं
फाराचि दुर्लभ आहे ॥

अवाच्य चेष्टित विषमशराचें
हें तों पळहिनसाहे ॥ १ ॥
तथापि माझें मन हें सहसा
आनंदा तें लाहे ॥ २ ॥
ह्मणोनि वाटे वांछितसिद्धी जवळ
चि येऊं पाहे ॥ ३ ॥

(असें बोलून मदनानें उत्कंठित होऊन उभा रहातो)

(तदनंतर विमानांत बसून उर्वशी

आणि चित्र लेखा दोघी येतात).

चित्र.-सखी उर्वशी, मला कारण सांगीतल्या वांचून कोठें जात आहेस?

उर्व.-(मदनातुर झाल्या सारखें करून) सखी, पूर्वी हेमकूट पर्वतावर लतेच्या फांदीस माझी माळ अडकली, तेव्हां तुला मी ह्मणाल्येंकीं, माझी माळ सोडीव, तेव्हां तूं माझी थट्टा करून बोल-लीस कीं ही फार बळकट अडकली आहे बाई ही माझ्यानें सुटावयाची कठिण. आतां कारण सांगितल्या वाचून कोठें जातेस ह्मणून मलाच पुसतेस काय?

चित्र.--हाँहाँ, राजर्षि जो पुरूरवा त्या कडें जातेस काय ?

उर्व.—होय, निर्लज्जपणाचा उद्योग तो हाच.

चित्र.—बरें, त्याज कडें पुढें कोण पाठविलें ?

उर्व.—कोण पाठविलें ह्मणजे ? त्द्दय पाठविलें.

चित्र.—अगोपण हो, इतकें त्द्दय मोकळें सोडून को काहीं धैर्य धर.

उर्व.—अगे मदनाच्या आज्ञे पुढें धैर्य कशाचें ?

चित्र.—बाई, हद्द झाली, या पुढें माझें बोलणेंच खुंटलें.

उर्व.—तर मग मला उपाय सांग, ज्या उपायानें मी तिकडें जात असतां मधें दैत्यादिकांचा अड थळा होणार नाहीं.

चित्र—सखि स्वस्थ ऐस, भगवान् देवांचा गुरु जो बृहस्पति त्याणें आह्मास अपराजिता नामक शिखाबंधिनी विद्या दिली आहे तिच्या प्रभावानें आपल्यावर दैत्याचें काहींच चालावयाचें नाहीं.

उर्व.-सखि, हें माझ्या अंत:करणांत स्मरत आहे, तथापि अत्यंत भयानें संशय उत्पन्न होतो. (दोघी इकडे तिकडे फिरतात).

चित्र.-सखि, पहापहा यमुनेच्या संगमानें अत्यंत पवित्र अशा ह्या भागीरथीच्या उदकांत प्रति बिंबाच्या मिषानें आपलें स्वरूपच पहात आहे काय असें जें प्रतिष्ठान नगर त्याचें शिरोभूषण भूत असें हें त्या राजर्षीचें भवन आहे तेथें आपण येऊन पोहचलों.

उर्व.-(उत्कंठा पूर्वक अवलोकन करून) अहाहा, हा एक भूतलावरील स्वर्गच आहे असें ह्मणा-वयास चिंता नाहीं, गडचें, चित्रलेखे, तो दी-नावर दया करणारा राजर्षि कोठें असेल बरें ? हें प्रमदवन आहे हें जणों, नंदनवनाचा एक प्रदेशाच आहे ह्यांत उतरून तो कोठें हें पाहूं (दोघी खालीं उतरतात).

चित्र.-(राजास पाहून) सखी, नूतन उदय पावले-ला भगवान् चंद्र जसा चंद्रिकेची अपेक्षा कारि-तो तसा हा राजर्षि तुह्मी अपेक्षा करीत आहे.

उर्व.-सखी, महाराजांचें दर्शन मला पहिल्या पेक्षा ही अधिक संतोष देत आहे.

चित्र.-योग्यच्च आहे, तर मग ये, आपण महाराजा जवळ जाऊं.

उर्व.-मी इतक्यांत जवळ येत नाहीं, क्षणभर ह्या पडद्याच्या आड उभी राहून महाराज एकांतीं आपल्या मित्राशीं काय बोलत आहेत तें कान देऊन ऐकत्यें.

चित्र.-तुझी मर्जी असेल तसें. (दोघी तसें करतात

विदू.-महाराज, दुर्लभ जो तुमचा इष्टजन त्याच्या समागमाचा उपाय मला सुचला.

उर्व.-अशी कोणस्त्री धन्य असेल? जिचें चिंतन महाराज करीत आहेत. आणि ती आपल्या आनंदांत आहे.

चित्र.-सखि, अवकाश कां करितेस? ध्यान करून पहा ह्मणजे समजेल धन्य कोण तें.

उर्व.-सखि, एकाएकी ध्यान करून जाणावयास भय वाटतें.

विदू.-अहो महाराज, दुर्लभ जनाच्या सामागमाचा उपाय मला सुचला असें मी ह्मणतों हिकडे चित्त आहे काय?

राजा.-सांग सांग मित्रा, काय उपाय तो.

विदू.-महाराज, तुम्हीं झोपघ्या म्हणजे स्वप्नांत तुम्हाला तिचा समागम प्राप्त होईल किंवा पाटीवर उर्वशीचें चित्र लिहून त्याकडे पहात बसा म्हणजे समागमाचें फळ होईल.

उर्व.-सखि, आतां हृदयास भरवसा देण्यास चिंता नाहीं.

राजा.-मित्रा, हे दोन्ही उपाय अशक्य आहेत पहा.

साक्या.

स्मरशरलागुनि सशल्य माझें
हृदय सख्या हें आहे ॥
स्वप्नीं संगमदात्री निद्रा ये
इल मज कशि पाहे ॥ १ ॥
चित्रीं जरि मी काढुनि पाहिन
सुमुखीतरिहे नयनीं ॥
अश्रूयेती काय करावें उपाय?
न सुचेच मनीं ॥ २ ॥

चित्र.—सखी. हें ऐकिलें नों ?

उर्व.-ऐकिलें, पण ह्रदयास पुरेसें झालें नाहीं.

विदू.—माझ्या बुद्धीचें सामर्थ्य इतकेंच बाबा.

राज.-(श्वसोल्लास टाकून).

श्लोक.

कठिण बहुत माझ्या रोग चित्तांत ऐसा।
मृदुतर ह्रदया हीती नजाणेच कैसा ॥
समजुनि अथवा मत्प्रेम, ती स्वप्रभावें
उगिच करि विनोद स्त्री विलास स्वभावें।१।
तिजवरि मन माझें लावुनी पंचबाण
नुपजवुनि फलातें त्याचिया हा अजाण ॥
करुनि विरसत्याला दुर्दशातेंचि पावो
करुनि करुनि पीडा स्वांतरीं धन्य होवो।२।

उर्व—(पाहून) मी इतकी निर्दय आहे असें महाराज समजतातनां ? काय करूं माझ्यानें महाराजा समोर धिट्टपणानें उभें रहावत नाहीं, या करितां माझ्या मनांत असें येतेंकीं, आपल्या प्रभावानें भूर्जपत्र निर्माण करून त्यावर आपलें वृत्त लिहून ह्यांच्या पुढें टाकावें.

चित्र--हो गडये, हें माझ्या मनास येतें,

उर्व.-(पत्र लिहून पुढें टाकते).

विदू.-आश्चर्य आहे, मित्रा, हें कायरे? मला खाव यास ही सर्पाची कांत तर आली नाहींना ?

राजा.-(पाहून) अरे वेड्या, सर्पाची कांत कशाची ? हें भूर्ज पत्र आहे आणि ह्यावर कांहीं अक्षरें लिहिलीं आहेत.

विदू.-मला असें वाटतेंकीं, तुझा विलाप ऐकून उर्वशीनें दृष्टी न पडतां तुझ्या सारखेंच तिचें प्रेम आहे असें सुचविणारें पत्र तुला पाठविलें आहे.

राजा-दैव करूं लागलें तर अघटित कांहीं नाहीं (पत्र घेऊन आणि वांचून) मित्रा, तुझा तर्क खरा रे खरा.

विदू-पत्रांत काय लिहिलें आहे तें ऐकावें असें माझ्या मनांत आहे.

उर्व-चांगलें, आर्या चांगलें, चतुर आहेस.

राजा-मित्रा, ऐक (असें बोलून पत्र वाचतो)

महाराज तुह्मावर माझें अत्यंत प्रेम असून आपण असें मनांत आणिलेंकीं, ही माझी व्यथा जाणत नाहीं, तसेंच मजवर आपलें अत्यंत प्रेम असून आपण माझी व्यथा जाणत नाहीं असें मीही मनांत आणिलें, असो, सांप्रत माझी दशा कशी आहे तें चरणा पाशीं निवेदन करत्यें, मृदू मृदू पारिजात पुष्पाच्या शय्येवर ही मला निद्रा येत नाहीं आणि नंदन वनांतलि मंद मंद वायु माझ्या शरीरास अग्नी सारखा तापदेत आहे.

उर्व-सखी, महाराज या पुढें काय बोलतील कोण जाणे.

चित्र.-अगे, महाराजांचीं अंगें कोमलकमला सारखीं म्लान झालीं आहेत यावरून महाराज काय बोलतील हें समजत नाहीं काय ?

विदू.-अहाहा, फार चांगलें झालें, तुमच्या समाधानाचें कारण हें भुभुक्षिताला मला पोळयाचें संधानच उपस्थित झालें असें मी समजतों.

राजा.-मित्रा, समाधानाचें कारण ह्मणून सांगावें काय पहा.

साक्या.

सुललित रचना रमणीयार्थ
प्रतिपदि होय जयांत ॥
तुल्य प्रीतीचें सूचक हें पत्र
भरे ह्रृदयांत ॥ १ ॥
वाटे, उघडुनि नयन मदानन
मदिरेक्षणाननाशीं ॥
प्राप्त समागम होउनि बोले
समक्ष तीच्या पाशी ॥ २ ॥

उर्व—या विषयीं आपली परस्पराची बुद्धि सारखीच आहे.

राजा.—मित्रा, अंगुलीच्या घर्मानें पत्रावरील अक्षरें पुसतात या करितां हें पत्र तूं घे आणि ही माझ्या, प्रियेची ठेवच आहे असें समजून ह्याचें संरक्षण कर.

विदू.—तर मग ती उर्वशी आपलें मनोरथ रूप पुष्प दाखवून त्याचें फळ तुला दाखविण्यास विलंब कां करीत आहे ?

उर्व.—सखी, मी समोर उभी राहून बोलावयास भि-

त्यें, या करितां मला धैर्य येईपर्यंत अंमळ तूं महाराजा पुढें प्रगट होऊन माझ्या मनांत जें बोलावयाचें आहे तें बोल.

चित्र.-(राजा जवळ जाऊन) महाराजांचा जयजयकार असो.

राजा.-चित्रलेखे, तुझें स्वागत असो. तिच्या बाजूकडे पाहून.

श्लोक.

सजान्हवीते यमुनेससंगमीं
तशीच पूर्वी तुजला ससंग, मी॥
तया सखीशीं अवलोकिलें, तसा
न हर्ष देशी तिजवीण मानसा ॥ १ ॥

चित्र.-असेंच आहे, प्रथम मेघ पंक्ति दिसते, आणि मागून विद्युल्लता दिसते.

विदू.-(मनांत) मी ह्मटलेकीं, हीच उर्वशी असेल, पण तिची सखी आहे.

राजा.-हें आसन आहे, ह्यावर बसावें.

चित्र.-(आसनावर बसून) महाराज, उर्वशी मस्त-

कावर अंजलि पुढें करून विनंति करीत आहे.

राजा.-काय अज्ञा करीत आहे ?

चित्र.-अशी विनंति करीत आहे कीं, जेव्हां मला दैत्या पासून महत् संकट प्राप्त झालें तेव्हां महाराजानींच माझें संरक्षण केलें, सांप्रत महाराजाच्यां दर्शनानें उत्पन्न जो काम त्याणें मला अत्यंत पीडा दिली आहे या करितां पुन्हा ही महाराजानीं मजवर दया करून मला या संकटांतून मुक्त करावें अशी माझी विनंति आहे.

राजा.-सखे, ऐक.

श्लाक.

सोत्कंठ प्रिय दर्शना बहुत
ती ऐसें खरें सांगसी
झाला आर्त पुरूरवा. तिज
मुळें हें कांन तूं पाहशी ॥
दोघांची समतोल, जाण चतुरे
प्रीती, करी योगहा
तप्तायासहतप्तलोह मिळतें
योजून देतां पहा ॥ १ ॥

---

१ तापलेलें अय ह्मणजे लोह त्याशीं.

चित्र-(उर्वशीजवळ येऊन) सखि, तुझ्या प्रियत माला तुजहून अधिक मदनाची बाधा झाली आहे, हें पाहून त्याची दूती होऊन आल्यें आहें

उर्व.-(भयानें कंपित होउन) बरीकीगे आहेस, लवकरच मला सोडून जातेस.

चित्र.-(किंचित् हास्य करून) दोन घटकेनीं सांगेन, कोणास कोण सोडतें तें असो, आतां अंगावर पदर नीट घेऊन पुढें ये.

उर्व-(भीत भीत पुढें येउन लज्जा युक्त होऊन) महाराजांचा जयजयकार असो.

राजा.—(हर्ष युक्त होऊन) सुंदरि,

आर्या.

मी जिंकिलें खरें आजि, तूं
मज्जय शब्द बोलतां, आला
पुरुषांतरास इंद्रापासुनि जय
शब्द, लाभ्यन पराला ॥ १ ॥

(असें बोलून हात धरून उर्वशीला आसनावर बसवितो.

विदू.—(उर्वशीला) कशीगे तुझी हीचाल? बरें, राजाचा प्रिय मित्र तशांत ब्राह्मण त्याला नमस्कार करावा तें कांहीं नाहीं.

उर्व.-(किंचित् हसून नमस्कार करते).

विदू.-अष्टपुत्रा सौभाग्यवती भव (इतक्यांत पडद्यांत देवदूत बोलतो) चित्रलेखे, स्वस्थ बसलीस काय, त्वराकर उर्वशीला.

श्लोक.

प्रयोग तुह्मा भरतें मुनीनें
जो दीधला अष्टरस श्रमानें ॥
पहावया [१]स्वाभिनया तयाला
इछा सुरेंद्रास असे [२]सपाला ॥ १ ॥

(सर्व ऐकतात)

उर्व.-(ऐकून खिन्न होते).

चित्र.-उर्वशी, देवदूताचें वचन ऐकिलेंनों? आतां त्वरा कर आणि महाराजांचा निरोप घे.

---

१ ज्यांत उत्तम प्रकारचे हाव भाव आहेत २ लोकपालसहिताला.

उर्व.-(श्वासोच्छ्वास टाकून) सखे, माझ्या तोंडानें मला विचारवत नाहीं.

चित्र.-महाराज उर्वशी विज्ञप्ति करीत आहे कीं, मी परस्वाधीन आहें या करितां महाराजानीं मला आज्ञा द्यावी, ह्मणजे मजकडे देवेंद्राचा दोष येणार नाहीं.

राजा.-(अत्यंत दुःखानें) तुह्मी आपल्या स्वामीची आज्ञा मोडावी असें मी सांगत नाहीं पण ह्या जनाचें स्मरण ठेवावें, इतकेंच सांगतों.

उर्व.-(वियोगदुःख दर्शवून) राजाकडे पहात सखी सहवर्तमान जावयास निघते).

राजा-(उसासा टाकून) हरहर, आतां डोळे असून निष्फळ आहेत.

विदू.-(राजास पत्र दाखवावयाच्या इछेनें) भूर्ज इतकें अर्धेंच बोलून (मनांत) अरे, मी उर्वशीच्या दर्शनानें अत्यंत विस्मित झालों, त्या मुळें तें भूर्जपत्र माझ्या हातून केव्हां पडलें त्याचें मला भान राहिलें नाहीं.

राजा.-मित्रा, तुझ्या मनांत काय बोलावयाचें आहे ?

विदू—माझ्या मनांत असें बोलावयाचें आहे कीं, उर्वशी गेली ह्मणून तूं आंग टाकूनको, कारण तुजवर तिचें मन पूर्ण बसलें आहे या मुळें ती तुजवरील प्रेमबंध शिथिल करणार नाहीं.

राजा.—मित्रा, मला ही असेंच वाटतें कारण, तिणें प्रस्थान करतेवेळेस.

साक्या.

शरीर तीचें खरेंच परवश,
परि त्हृदयस्वाधीन ॥
ठेवियलें तें माझ्या ठायीं
उदकीं जैसा मीन ॥ १ ॥
श्वासोच्छ्वासद्वारें आंतुनि
काढियलें बाहेर
स्तनकंपानें, कळलें हें मज
ह्मणुनि असें मी धीर ॥ २ ॥

विदू—(मनांत) माझ्या त्हृदयास थरथर कांप सुटला आहे कारण हा केव्हां भूर्जपत्राचें नांव काढील कोण जाणें.

राजा.—मित्रा, आतां उत्कंठित झालेलें माझें मन

कशानें स्वस्थ होईल ? (स्मरण करून) तें भूर्ज पत्र तरी आण बरें.

विदू-(इकडे तिकडे पाहून खिन्न होऊन) आतां काय करूं ? तें दिव्य भूर्जपत्र कोठें दिसत नाहीं तें ऊर्वशीच्या मागून उडून गेलें असें वाटतें.

राजा.—हा बेट्या मूर्खा, रांडेच्याला सर्वदा शुद्धी नसत्येच बरें, आतां नाहीं नाहीं ह्मणून बसलासकाय, इकडे तिकडे पहा कोठें पडलें असेल (इतक्यांत राणी, चेटी आणि दुसरे सेवकयेतात)

विदू--(उठून) इकडे असेल तिकडे असेल असें ह्मणून इतस्ततःनाचतो).

राणी—निपुणिके, खरेंच कायगे, महाराज माणवकभटजीसहवर्तमान लतागृहांत प्रवेश करतानां त्वां पाहिलें.

चेटी—बाईसाहेब, मी आज पर्यंत पायापाशीं कधीं तरी खोटें सांगितलें काय ?

राणी.—बरेंतरमग, मी ह्या लतेच्या आड उभी राहून काय हित गुज चाललें आहे तें ऐकत्यें.

चेटी.—जशी बाईसाहेबाची मर्जी असेल तसें.

राणी.—(पुढें पाहून) निपुणिके, दक्षिणेकडून वा-यूनें उडत येत आहे हें पत्र कशाचें गे ?

चेटी.-(पाहून) बाईसाहेब, हें भूर्जपत्र आहे आणि ह्यावर कांहीं अक्षरें ही आहेत.

अगे बाई, हें बाईसाहेबांच्या पायांतील साखळीलाच अडकलें हें घेऊन वाचावें तरी.

राणी,-तें घेऊन वाच, पण विरुद्ध नसेल तर ऐकेन

चेटी—(पत्र पाहून) बाईसाहेब, तेंच उर्वशीचें कपट दिसत आहे, महाराजांच्या उद्देशानें उर्वशीनें रचिलेलें काव्य ह्या पत्रांत लिहिलें आहे, हें माणवकाच्या हातांतून पडलें, ते आमच्या हातीं लागलें.

राणी.-तरमग वाचून त्यांतील अभिप्राय मनांत आण.

चेटी.-(पत्र वाचते).

राणी.-निपुणिके, फार चांगलें झालें, हीच नजर घेऊन आपण त्या अप्सराकामुकास पाहूं.

चेटी--आज्ञा बाईसाहेब.

विदू-मित्रा, तें पहा पत्र वायूनें क्रीडा पर्वतावर उडत आहे.

राजा-(उठून) भगवंता, वसंतसखे, मलयानिला

## दिंड्या.

जरीव्हावा, मारुता तुलावास,
तरी पुष्पांच्या आणि तूं रजास ॥ १ ॥
प्रियास्नेहाचा होय जो स्वकरमाझा
हरुनि त्याला कायबा लाभ तूझा ॥२॥
याच रीतीं विश्रांति साधनानें
जीव धरुनी कामार्त दुर्दशाने ॥ ३ ॥
जाणतोशी त्याजला दुःखद्याया,
परी स्वरुथीं[१] बळतुझें होय वाया ॥ ४॥

चेटी.-बाईसाहेब, पाहिलेंतनां ? त्याच भूर्जपत्राचा शोध चालला आहे.

राणी.—मी पहात्येंच आहे, तूं अंमळ उगीच बैस.

विदू.-अरे फसलों रे फसलों, विकसितनीलकमला सारखी ज्याची कांति असें हें मोराचें पीस आहे.

१ स्वस्थचित्तावर.

राजा--हरहर, मी सर्वथा बुडालों.

राणी.-(अकस्मात् पुढें येऊन) महाराज, घांबरूं नका, हें घ्या तें भूर्जपत्र.

राजा.-(गडबडीनें मनांत) अरे, राणी आली, (विरस होऊन) यावें चांगलें आगमन झालें.

राणी--चांगलें कशाचें? ह्या प्रसंगीं माझें आगमन जसें खिरींत मीठ तसें झालें.

राजा.-(विदूषकाच्या कानाशीं लागून) कायरे गड्या आतां कसें करावें? काय बाहणा करावा?

विदू.-महाराज, चोराचा मुद्दा सांपडल्यावर बाहणा चालतो काय?

राजा--राणीसाहेब, मी ह्या भूर्जपत्राचा शोध करीत नाहीं. काहीं राज्य प्रकरणीं कागद हरवला आहे त्याचा शोध करीत आहें.

राणी--शहाण्यानीं आपलें सौभाग्य झांकून ठेवावें हेंच योग्य.

विदू.-असो बाईसाहेब, ह्यांच्या भोजनाची तयारी लवकर करा, ह्मणजे ह्यांचें पित्त बसेल आणि हे स्वस्थ होतील.

राणी.–निपुणिके, ह्या ब्राह्मणानें आपल्या प्रियमित्रास चांगले गुण शिकिविले.

विदू—पहा, पक्वान्नाचा लाभ झाला असतां कोणी ही संतोषच पावत असतो.

राजा.–मूर्खा, बळेंच मजवर अपराध लागू करतोस काय ?

राणी.-स्वामींचा अपराध कांहीं नाहीं, मीच अपराधी आहें, कारण मी तुमच्या आनंदासआड आल्यें निपुणिके, चल हिकडे ये. (असें बोलून कोपानें जाऊं लागते).

राजा.- साक्या.

अपराधी मी खराच आहें,
प्रसन्न हो रंभोरू ॥
करूं नकोगे मजवरि सखये,
कोप असा अनिवारू ॥ १ ॥
कुपित स्वामी झाला असतां
दासानें अपराध ॥
केला नाहीं ऐसें ह्मणतां ये
इलजगांतबाध ॥ २ ॥

(असें बोलून राणीच्या चरणावर मस्तक ठेवितो)

राणी.-कपट्या, तूं पश्चाताप युक्त होऊन सरळ झालास ह्मणजे मी तुला भीतच आहें, पण ह्या वेळीं माझें ह्रदय अगदीं क्षुद्र झालें आहे, या मुळें मी तुझें हातापायापडणें काहीं एक ऐकत नाहीं.

चेटी.-चलावें बाईसाहेब, असें इकडून यावें. (राणी राजाला सोडूनपरिजनासहवर्तमान तेथून निघते)

मित्रा, ऊठ ऊठ, बसलास काय, ही राणी पर्जन्य काळांतील नदी सारखीगढूळ होऊन फुंफूं करीत चालली आहे तिच्या पाया पडून समजूत कर.

श्लोक.

प्रीतीविणें मधुर बोलुनियां स्त्रियांच्या
केल्या बहू अनुनयास, शिरेन त्यांच्या॥
चित्तांत तो मणिजसा अतिकृत्रिमानें
तज्ञास रंगवुनि दीधलियानमानें ॥१॥

विदू.—बरें झालें, ती गेली हें तुझ्या पथ्यास पड-

लें, कारण ज्याच्या नेत्रास रोगझाला त्याला समोर दीप शिखा सोसवत नसते.

राजा.—छेछे, मित्रा, असें बोलूंनको जरी माझें अंतःकरण उर्वशी कडे लागलें आहे तरी राणीवरील बहुमान जो आहे तोच आहे, पण मी ज्या अर्थी तिच्या पायां पडलों असतां तिणें मानिलें नाहीं त्या अर्थी अता कसें करून धैर्य धरून बसतों.

विदू—आतां ही राणीची कथा पुरे बाबा, माझा. भुकेनें प्राण कासावीस होत आहे या करितां काहीं माझ्या जिवाकडेपहा. अतिकाळ झाला आहे, काहीं स्नान भोजन केलें पाहिजेकीं नको

राजा.—(वर पाहून) अरे, टळटळति दुपार झाली. ह्मणूनच.

श्लोक.

उष्णें तप्त मयूर हा तरुतळीं
शीताल वाळीं बसे
भेदोनी मृदुकर्णिकारकुसुमें
भृंगालि तेथें वसे ॥
टाकोनी जल तप्त तीरनलिनी

पाशी पहा पावला
हाकारंडव[4], पंजरस्थ शुक हा
तृष्णात इछी जला ॥ १ ॥

(असे बोलून सर्व जातात.)

(दुसरा अंक समाप्त).

---

ज्यांचें आळें थंड आहे २ पांगारा ३ भ्रमरांचीं पंक्ति करडुवा या नावाचा पक्षी.

# विक्रमोर्वशीनाटक.

## अंक ३.

### पात्रें.

पहिला ............ शिष्य.
दुसरा ............ शिष्य,
कंचुकी ............ भालदार.
राजा ............ पुरूरवा.
विदू ............ हास्य रस प्रधान राजाचा मित्र
परिजन ............ सेवकजन.
उर्वशी ............ अप्सरा.
चित्रलेखा ............ उर्वशीचीसखी.
राणी ............ रांजपत्नी.
चेटी ............ दासी.

# विक्रमोर्वशी नाटक.

## अंक ३.

(तदनंतर दोघे भरताचे शिष्य येतात).

पहिला.-सख्या पैलवा, गुरूजी अग्नि शाळेंतून निघून जेव्हां इंद्राच्या सभेस गेले तेव्हां त्यांणीं तुझ्या पाशी आसन देऊन तुला बरोबर नेलें होतें आणि मला अग्निशाळेच्या रक्षणसाठी ठेविलें, ह्मणून मी तुला पुसतोंकीं, गुरूजीनीं तेथें जाऊन जो नाटकाचा खेळ केला, तेणे करून देवांची सभा संतोष पावली काय ?

दुसरा.-संतोष पावली असेल असे तर मला वाटत नाहींच कांकीं, त्यासभेंत खरस्वतीनें केलेलं जें लक्ष्मीस्वयंवरनाटक त्याच्या खेळांत उर्वशी त्या त्या रसाच्या प्रसंगीं बोलतानां भांबावली,

पहिला--दोष प्रकट झाल्या मुलें असें ह्मण.

दुसरा.-हो खरेंच ती बोलतानां चुकली.

पहिला.-काय चुकली ?

दुसरा.—उर्वशीनें लक्ष्मीचें सोंग घेतलें होतें आ-

जि मेनकेनें वारुणीचें सोंग घेतलें होतें तेव्हां मेनकेनें उर्वशीस विचारिलें कीं, अगे लक्ष्मी ह्या सभेंत ब्रह्मा, विष्णु आणि महेश्वर आदिकरून त्रैलोक्यांतील सर्व पुरुष लोकपालासहवर्तमान आले आहेत इतक्यांतून तुझें अंतःकरण कोणावर आहे ?

पहिला.—मग पुढें ?

दुसरा.—तदनंतर पुरुषोत्तमावर असें ह्मणावयाचें सोडून पुरूरव्यावर अशी तिच्या मुखांतून वाणी निघाली.

पहिला.-उपाय नाहीं, होणारा सारखी बुद्धि होत असतें बरें, पण, गुरूजी तिजवर रागेतर भरले नाहींतनां ?

दुसरा.—नाहींत कसे ? गुरूजीनीं तिला शापदिला, पण इंद्रानें तिजवर अनुग्रह केला.

पहिला.—गुरूजीनीं तिला काय शापदिला आणि इंद्रानें अनुग्रह काय केला ?

दुसरा.-गुरूजीनीं असा शाप दिलाकीं, ज्या अर्थी तूं माझ्या आज्ञेचें उल्लंघन केलें, त्या अर्थी स्वर्गस्थानांतून भ्रष्ट होशील आणि तुला दिव्यज्ञा-

न रहाणार नाहीं, मग उर्वशीनें लज्जायुक्त हो-ऊन तोंड खालीं घातलें, असें पाहून इंद्रानें असा अनुग्रह केलाकीं, ज्यावर तुझें अंतःकरण बसलें आहे तो राजर्षि रणांत माझें सहाय्य करीत असतो या मुळें मला त्याचें प्रियकर्तव्य आहे, या करितां तूं त्या राजाचें मनोधारण कर आणि त्याला संतानाचालाभ होई तों पर्यंत तयापाशी रहा.

पहिला.-आपण महासमर्थ असून अन्य पुरुषाच्या पराक्रमास मान देण्याचा ज्याचा स्वभाव अशा इंद्रास उर्वशीवर अनुग्रह करणें हें योग्यच आहे.

दुसरा—(सूर्याकडे पाहून) अरे. गोष्टी सांगतां सांगतां गुरूजींच्या स्नानाची वेळ होऊन गेली, आतां लवकर चल गुरूजींच्या जवळ जाऊं.

(असें बोलून दोघे शिष्य निघून जातात)

(तदनंतर कंचुकी येतो)

कंचुकी॰ श्लोक.

तारुण्यांत गृही प्रयत्न सगळे
अर्थाकडे लाविती

वार्धक्यीं निजभार अर्पुनिसुतीं
विश्रांतितें पावती ॥
भाळीं आमुचियाचि शेवटवरी
सेवालघुत्वप्रदा
कांहो ! हास्त्र्यधिकार कष्ट, सु
टकाव्हावी तरीहीकदा ॥ १ ॥

राणीसाहेब काहीं व्रताच्या नियमांत आहेत, त्यांणी मला अज्ञा केली आहेकीं, " माझें व्रत सांग व्हावें या करितां मी आपलामान एकीकडे ठेऊन निपुणिकेच्या मुखानें पूर्वी महाराजास प्रार्थना पूर्वक बोलाविलें आहेच, तूंही माझ्या वचनवारून महाराजास प्रार्थना कर, तर आतां महाराजांची स्नानसंध्या आटोपली असेल त्यांजकडे मी जातों. (हिकडे तिकडे फिरून पाहून) अहो ह्या राजवडयांत सायंकाळ समयीं किती शोभा दिसत आहे.

ओव्या.

वर्णावी ही शोभाकाय, वर्णितां नपुरेधाय, वाटतें लक्ष्मीच सकाय, चोंहींकडे खेळतसे ॥ १ ॥ संध्या समयीं जमून,

बैसलें[1] वासयष्टी धरून, मोरनिद्रालस होऊन, दिसती काष्ठीं कोरलेसे ॥ २ ॥ गवाक्षांतूनि वरती, नानापरीचे धूप निघती, जाणो वेलभी[2] वरी पंक्ति, पारा तांची बैसलीसे ॥ ३ ॥ हिकडे आचार तत्पर, वृद्धांगना भूमीवर, सडा संमार्जन सादर जागोजागीं करिताति ॥४॥ वरीरंगवल्लीघालिती, त्यावरी पुष्पें विखरती, तेथें मंगल दीपिका लाविती, चोहीं कडे लखलखाट ॥ ५ ॥

(पाहून) अहो, राजा हिकडेच येत आहे, जो कसा आहे.

श्लोक.

परिजन वनितांनीं घेतल्या ज्या करानीं
लखलखित मशाली वेष्टिलासे तयानीं ॥
क्षितिधरांचे[3] जणो हा पक्षवान् चालताहे
बहुसमित अशाजोकर्णि[4] कारास वाहे ॥१॥

---

१ बसावयाचा काष्टदंड २ घरावर कवला खालीं तिरकसवासे घालतात तें किंवा सायवान किंवाछपरा सारखे आच्छादन ३ पर्वत ४ पांगारा.

आतां मी वाटेंत उभा रहातो ह्मणजे राजाच्या दृष्टी पडेन. (असें बोलून उभा रहातो) तद नंतर पूर्वी सांगितल्या प्रमाणें राजा आणि विदूषक परिजनासहवर्तमान येतात).

राजा.-(मनांत).

आर्या.

कार्यामुळें कसातरि, सोडुनि
औत्सुक्य दिवस घालविला ॥
कर्मणुकी विण न्यावी. दीर्घनि
शाकशि सुचेनमन्मतिला॥ १ ॥

कंचु.-(जवळ येऊन) जयतु जयतु महाराजः राणी साहेब विज्ञप्ति करीत आहेतकीं, गच्ची वरून चंद्राचें दर्शन चांगलें होत आहे या साठी जोंपर्यंत चंद्राचा आणि रोहिणीचा योग आहे तों पर्यंत आपण तेथें असावें.

राजा.-बरें आहे जा, राणी साहेबास जाऊन सांग कीं, तुमच्या मर्जी प्रमाणे करतों.

कंचु.-बरें आहे (असें बोलून जातो).

राजा.-मित्रा, राणीचा हा यत्न खरोखरीच व्रताच्या उद्देशानें असेल काय ?

विदू.—मला असें वाटतेंकीं, तूं तिच्या पाया पडला-स असें असतां तिणें मानिलें नाहीं त्यामुळें ती पश्चाताप युक्त होऊन आपल्या अपराधाचें परिमार्जन व्हावें या करितां व्रताच्या उद्देशानें हा उद्योग चालवीत आहे.

राजा.—खरें गड्या, असेंच असेल.

आर्या.

प्रथमतिरस्कारुनिया, प्रणतीतें,
पावताति मग ताप ॥
[१]नानादयितानुनयें, रमणी होता
तिलज्जितअपाप ॥ १ ॥

विदू.—चलावें, असें इकडून यावें महाराज, ज्याच्या पाहिऱ्या गंगातरंगाच्या संपर्कानें शीतल आहेत असा हा स्फटिकाचा जिना आहे ह्यानें वर चढावें. (सारेवर चढतात) आतां चंद्रोदय लवकर होईल असें वाटतें, कारण पूर्व दिशेचें मुख अंधकाररहित होऊन आरक्तप्रभ दिसत आहे.

राजा.-चांगलें बोलतोस.

---

१ दयित ह्मणजे पति त्यांणी केलेले जे नानाप्रकाराचे अनुनय ह्मणजे समजुती.

श्लोक.

उदयाद्रि आड उगवूनिचंद्रमा,
किरणे करूनि वरि सारितां तमा ॥
जणुकेश सारुनि बलारिदिङ्मुख,
हरुनी मदक्षियुगुलास दे सुख ॥ १ ॥

विदू.-अहाहा, अर्ध्या मोदकासारखा हा चंद्र उदय पावला.

राजा—(हसून) पोट्याला जिकडे तिकडे खाण्याचा पदार्थ दिसत असतो. (हात जोडून नमस्कार करून) भगवंतानक्षत्रनाथा.

श्लोक.

कर्मांची रुचि सुजनास तूंचि देशी
रात्रींचें तिमिर लयास तूंचि नेशी ॥
पीयूषें[१] सुरपितरतृप्तिदा सुभासा
चंद्रामी तुज नमितों [२]हेरावतंसा ॥ १ ॥

विदू—मित्रा, माझ्या पायास कळ लागली, या करितां मज ब्राह्मणाच्या मुखानें ब्रह्मदेव किंवा

---

१ देव आणि पितर यांस तृप्ति देणाऱ्या २ हे शिवशिरोभूषणा.

तुझा अजाच आज्ञा करीत आहे असें मानून आसनावर बैस, ह्मणजे मला क्षणभर सुखानें बसावयास सापडेल.

राजा—(बसून आणि दासी कडे पाहून) ह्या चंद्रिकेंत मशालींचा कांहीं उपयोग नाहीं याकरितां तुह्मी घटकाभर विश्रांति घ्या.

परिजन.–आज्ञा महाराज, (असें बोलून जातो).

राजा.–(चंद्राकडे पाहून विदूषकास ह्म०) मित्रा, दोन घटिकेनीं राणी येईल, या करितां एकांत आहे तों पर्यंत माझी दशा काय झाली आहे ती तुला सांगतों.

विदू.-मित्रा, ती उर्वशी तर येतां दिसत नाहीं परंतु तिणें तुजवर प्रीती दर्शविली आहे या मुळें आशेने मात्र जीव धरून बसणें योग्य आहे.

राजा—वास्तविक असेंच आहे कांकीं, अंतःकर्णास फारच पीडा होत आहे पहा.

आर्या.

विषमशिलानी कुंठितरयंसरितेचा
प्रवाहसा काम ॥

शतघट होय समागमसुखविघ्नीं
वाठुनी मनोधाम ॥ १ ॥

विदू.-मित्रा, तुझें शरीर इतकें कृश झालें तरी सुशोभित दिसतें ह्या लक्षणावरून तुझा त्या अप्सरेशीं समागम खचित होईल.

राजा--(कांहीं शुभचिन्ह झालेंसें दर्शवून).

आर्या.

अत्यंत व्यथिताचें, माझें स्फुरु
नी करी समाश्वसन ॥
आशोत्पादक वचनें, तुजसमम
द्रुज, सरेल हें व्यसन ॥ १ ॥

विदू.-माझें ब्राह्मणाचें वचन कधीं खोटें होणार नाहीं

राजा--(आशा धरून बसतो) (तदनंतर अभिसारिकेचा वेष धरून विमानांत बसून उर्वशी चित्रलेखेसहवर्त्तमान येते).

उर्व--(आपणाकडे पाहून) सखी, मी अंगावर नील

---

१ लहान मोठया दगडनी २ ज्याचारय म्हणजे वेग कुंठित आहे
३ समागम सुखास जी विघ्नें त्याणी.

रत्नांचे आणि मोत्यांचे दागीने घालून अभिसा-रिकेचा वेष घेतला आहे, हावेष माझ्या मनास फार आवडतो.

चित्र.-अहाहा, काय तुझा वेष सांगावा ! ह्या वेषाची प्रशंसा करण्या जोगतें माझ्या वाणींत सामर्थ्य नाहीं, परंतु मनांत असें चिंतन करित्येंकीं ह्या वेळेस मी जर पुरूरवा असत्यें तर फार चांगलें होतें.

उर्व-सखी जातीनें तिकडे जाण्याची मला शक्ती नाहीं, या करितां तूं त्या प्रियजनास माझ्याजवळ आण किंवा त्या मनमोहनाच्या जवळ मला घेऊनजा.

चित्र-(पाहून) अगे, घेऊन, जावयाचें तें काय ? आपण तुझ्या प्रियतमाच्या मंदिराजवळ आलोंच हें पहा मंदिर, जसें रात्रि रूप यमुनेंत कैलासाचें शिखरच प्रतिबिंबित झालें आहे असें दिसत आहे.

उर्व.—तर मग तो माझा ह्दयचोर कोठें आहे आणि काय करीत बसला आहे ? तें तूं आपल्या प्रभावानें चिंतन करून पहा बरें.

चित्र.-(चिंतन करून मनांत) आतां क्षणभर मी

हिचा विनोद करितें (उघडपणानें) सखी, उपभोगास योग्य अशा एकांत स्थळीं बसून मनोरथ करीत असतां त्यांत प्राप्त झालेल्या प्रियसमागमसुखाचा अनुभव घेतबसला आहे, असें मी ध्यानांत पाहिलें.

उर्व—पुरे, तूं आपल्या मनांत कांहीं तरी कल्पना करून बोलतेस, पण माझ्या मनास खरें वाटत नाहीं, कारणकीं, प्रियसमागमाच्या पूर्वींच त्याणें माझें मन हरण केलें आहे.

चित्र-(चिंतन करून) हा तुझा प्रियतम गच्चीवरील अरशे महालांत बसला आहे आणि त्याच्याजवळ त्याचा मित्र मात्र आहे, आतां आपण त्या च्या जवळ जाऊं. (दोघी खालीं उतरतात).

राजा—मित्रा ह्या रात्रीं सहवर्तमान मदनाची पीडा फारच वृद्धिंगत आहे.

उर्व-चित्रलेखे, प्रियसमागम ह्या भाषणाचा अर्थ मला स्पष्ट समजला नाहीं ह्मणून माझें मन भीत आहे, या करितां संशय दूर होई पर्यंत आपण गुप्त होऊन ह्या दोघांचें भाषण ऐकूं.

चित्र.-बरें आहे, तसें करूं.

विदू.-महाराज, तुह्मी ह्या अमृतमय चंद्रिकेंत बसावें ह्मणजे तुमची ही पीडा दूर होईल.

राजा.-मित्रा, अशा उपायानीं ही पीडा दूर होण्यासारखी नाहीं.

साक्या.

माझ्या अंगीं पसरुनि गेला दुर्धर
अनंगरोग ॥
नवकुसुमांच्या शयनें मसरे,
नसुचे काहीं भोग ॥ १ ॥
सर्वांगाला चंदनलेपें भंगन
होई यास ॥
सेवूंजातां चंद्रकिरण देती
बहु आयास ॥ २ ॥
मिाण मययष्टी पडतां दृष्टी
तुष्टी माझ्या नमना ॥
एकचि दिव्य स्त्रीती माझ्या
शकेल पीडाशमना ॥ ३ ॥
किंवा तिच्याच गोष्टी सांगत
बसतां एकांतांत ॥
वाटे होईल माझी दुस्तर
आर्ती काहीं शांत ॥ ४ ॥

उर्व.-हृदया, तूं मला सोडून येथून गेलास, त्याचें साफल्य झालें.

विदू—मित्रा, मला देखील जेव्हां गोड गोड शिकरण किंवा आंवा मिळत नसतो तेव्हां तेव्हां फार पीडा होत असते पण मी तिचें ध्यान करून समाधान पावत असतो.

राजा.-अरे खावू, तुला ती वरचेवर मिळत असते ह्मणून.

विदू.-तुला हीं ती उर्वशी लवकरच मिळेल.

राजा—मित्रा, मला असे वाटतें.

चित्र.-असंतुष्टे, ऐक.

विदू--कसें वाटतें?

राजा.— आर्या.

खडबडतां रथ तीच्या, स्कंधीं
मस्तकं धलागतां धन्य ॥
आहे एकचि, केवळ भूमीला
भार होय व पुअन्य ॥ १ ॥

चित्र—सखी, आतां विलंबका ? पुढें हो.

उर्व.-(अकस्मात् जवळ येऊन) चित्रलेखे, मी महाराजांच्या समोर उभी असून हे मला न पाहिल्या सारखें कां करतात बरें ?

चित्र.-(किंचित् हसून) अगे, चपले, तूं एक दुसऱ्याच्या डोळयास पडदाच आहेस (इतक्यांत पडद्यांत शद्ब होतो) बाई साहेब, असें असें इकडून यावें. (सारे कान देऊन ऐकतात).

उर्व.-(सखीसहवर्तमान खिन्न होते).

विदू.-(गडबडीनें) अरे, राणी आली, आतां बोलू नको, चिपबैस.

राजा.—तूंही आपलें रहस्य जसें बाहेर पडणार नाहीं तसा आकार धरून बैस.

उर्व.—गड्ये, आतां कसें करावें ?

चित्र—घाबरूं नको, आतां तूं गुप्तच आहेस आणि राणी व्रतस्थ आहे असें दिसतें, या मुळें ही येथें फारवेळ रहाणार नाहीं (इतक्यांत राणी आणि तिच्या मागून हतांत पूजा पात्र घेऊन दासी येतात).

राणी—(चंद्राकडे पाहून दासीस ह्म०) निपुणिके, हा भगवान् चंद्र रोहिणीच्या योगानें फारच शोभत आहे.

चेटी—असेंच आहे, यजमानिनीच्या योगानें यजमानास शोभा अधिकच असते (इकडे तिकडे फिरतात).

विदू-अहो महाराज, मला असें वाटतेंकी, हिच्या मनांत कांहीं वायन द्यावयाचें आहे हा एक लाभ आणि तुझ्या निमित्त जो रोष आला तो चंद्रव्रताच्या निमित्तानें टाकल्यामुळें देवी आज प्रसन्न वदन दिसते या मुळें माझ्या नेत्रास आल्हाद देत आहे हा दुसरा लाभ.

राजा.-(हसून) हे दोन्ही लाभ तुला योग्य आहेत पण मला तर पाठीं मागून बोललास तोच दिसत आहे कारण, ही देवी.

श्लोक.

शुभ्र दुधा परि पाताळ नेसलि
केवळ मंगळ भूषण अंगीं
कुंकुम चित्रित भाळ जिचें प्रिय
कारि सखीजन घेउनि संगीं ॥

सस्मित ही व्रत लोपमिषें, नि
जगर्व समग्रहि टाकुनि आली
आकृतिनेंच मशीं बहु शुद्धमना
दिसती, विजितें द्रिय झाली ॥ १ ॥

राणी.-आर्यपुत्राचा जयजयकार असो.

परिजन.-महाराजांचा जयजयकार असो.

विदू.-बाई साहेब कल्याण.

राजा.-यावें, देवी (असें बोलून राणीचा हात ध- धरून जवळ बसवितो).

उर्व—सखी, महाराजांनीं हिला देवी ह्मटलें हें युक्त आहे, कारण ही तेजस्वि तेनें इंद्राणीहून तिळ मात्र उणी नाहीं.

चित्र.-उर्वशी, मला असें वाटतेंकीं, तुला बोलाव यास तोंडे दोन आहेत.

राणी—महाराज, मला आपल्या अंगत्वानें कांहीं व्रत करावयाचें आह या साठी दोन घटका मा- झी अडचण सोसली पाहिजे.

राजा.-मित्रा, हीं अडचण नाहीं, हा एक आह्लाव-

र अनुग्रहच आहे असें शांतिक पौष्टिक करणाऱ्या माझ्या सारख्यास अशी अडचण वारंवार येईल तर फार चांगलें होईल.

राजा-देवी, तुह्माला जें व्रत करावयाचें आहे त्याचें नांव काय?

राणी.-(निपुणिकेच्या तोंडाकडे पहाते).

चेटी-महाराज, ह्या व्रताचें नांव प्रियप्रसादन.

राजा-(देवी कडे पाहून).

दिंड्या.

प्रिये माझे. सांग तूं व्यर्थ कांगे,
वाळवीशी हीं कमल कोमलांगे ॥ १ ॥
धरुनि सखये ह्या व्रता दिवसरात्र,
भोग सोडुनी हो शिकांक्लेशपात्र ॥ २ ॥
वाट पाहे जो तुझ्या प्रसादाची,
उतावेळा धरुनिया असा साची ॥ ३ ॥
कशासाठी त्याचिया प्रसादास,
इछिशी तूं तो असे तुझादास ॥ ४ ॥

उर्व.-(एकी कडे तोंड करून हसून) महाराजांचा हिजवर फारच बहुमान आहे बरें.

चित्र.-शहरांत रहाणारे आणि त्यांचें प्रेम अन्य स्त्रीवर असतें असे चतुर पुरुष स्वस्त्रीशीं फार अनुकूल वागत असतात.

राणी.-ह्या व्रताचा कसा प्रभाव आहे, ज्याणें आर्य पुत्रास इतकें वळविलें.

विदू.-आतां उगीच ओढून आणूनको. सज्जनाच्या भाषणाचा आनादर करणें योग्य नाहीं.

राणी, पोरींनो, माझें पूजा पात्र इकडे आणा. ह्या गच्चीवर चंद्राचे किरण पडले आहेत ह्यांची मी पूजा करत्यें.

चेटी.-अज्ञा बाईसाहेब हें पूजापात्र तयार आहे, यांत गंध पुष्पादिक सामग्री सर्व आहे.

राणी.-तें माझ्या जवळ द्या. (असें बोलून पुष्पादिकानीं चंद्र किरणाची पूजा करून दासीस ह्म० निपुणिके, हें मोदकाचें वायन माणवकभटजीस दे आणि यांतील थोडेंसें कंचुकीलाही दे.

चेटी.-अज्ञा बाईसाहेब. (असें बोलून विदूषकास ह्म०) भटजी बाबा, बाईसाहेबानीं आपणास हें वायन दिलें आहे.

विदू.-(मोदकाचें पात्र घेऊन) बाईसाहेबांचें कल्याण असो.

चेटी.-भालदार बाबा, हें तुझ्याला दिलें आहे.

कंचु.-(घेऊन) राणीचें कल्याण असो.

राणी-(राजास ह्म०) अंमळ हिकडे यावयाचें होतें.

राजा-हामी जवळच आहें.

राणी.-(पूजेचा अभिनय करून हात जोडून राजास नमस्कार करून मी रोहिणी आणि चंद्र ह्या देवतेच्या दंपत्यास साक्षी ठेऊन महाराजांस प्रार्थना करीत आहेकीं, महाराजचें अंतःकरण ज्या स्त्रीवर असेल आणि जीस्त्री महाराजांच्या समागमास उत्सुक असेल तिच्या सहवर्तमान आज पासून महाराजांनीं खुशाल रममाण असावें यांत माझा कांहीं अढथळा नाहीं.

उर्व-आश्चर्य आहे, हिचें भाषण कोणत्या अर्थाचें असेल तें असो, तें कळत नाहीं, पण माझें अंतःकरण भरवसा येऊन निर्मळ झालें आहे.

चित्र-सखी, हीपतिव्रता महानुभाव आहे, हिणें अनुज्ञा दिली आहे त्या अर्थी तुझा आणि तुझ्या प्रियाच्या समागम निर्विघ्न होईल.

विदू.-(तोंड मुरडून मनां.) आपल्या अवळून व ध्वजन पळून गेला असतां थोटा ह्मणतोकीं, जा तुला मीं जीवदान दिलें माझा धर्म होईल. तसें हें झालें (उघडपणानें) कांबाई साहेब, नवरा प्रिय नाहीं ह्मणून दुसऱ्यास देऊन टाकिला काय ?

राणी—मूर्खा, मला सुख नसले तरी चिंता नाहीं, पण तिकडे सुख असावें अशी मी इच्छा करित्यें या वरून प्रिय किंवा अप्रिय हें समज.

राजा.— श्लोक.

मुक्त्यार तूं मजपराप्रति द्यावयास
किंवा स्वदासचि अखंड करावयास
माझा तुला उगिच संशय येइजो हा
तैसा नमी खचित सोडिचि भीरुमोहा। १।

राणी—मेलें कसेंकां असेना, मला प्रिय प्रसादन व्रत करावयाचें होतें तें यथासांग झालें (दासीस ह्म०) चलागे पोरीनो, आपण जाऊं.

राजा—दासाचा संतोष केल्यावाचून जाणें योग्य नाहीं.

राणी.-पुरे लाडी गोडी. मीव्रतस्थ आहें या क-रितां मला नियम मोडावयाचा नाहीं. (असें बोलून सखी सहवर्तमान जाते).

उर्व.-सखि, ह्या राजर्षीची राणीवर प्रीति फारच आहे, परंतु माझें मन ह्यावर बसलें आहे तें निवृत करण्यास मला शक्य नाहीं.

चित्र-नीटच आहे, दृढ लागून राहिलेली आशा एकाएकी निवृत्त कशी होईल ?

राजा.-(आसनाजवळ येऊन) मित्रा राणी दूर गे-लीना ?

विदू.-गेली, दूर गेली आतां तुझ्या मनांत काय बोलावयाचें असेल तें बोल, रोग असाध्य अशी परीक्षा करून रोगातुरास वैद्यजसा सोडून देतो तसें तुला तिणें सोडिलें.

राजा--उर्वशी असें करील काय ?

उर्व-(मनांत) आज मी कृतार्थ होईन.

राजा- गीत.

झुमझुम पैंजण वाजत असतां, मंदमंद

गति येतां जातां ॥ ध्वनितरि माझ्या कानीं कांता, पाडिलती काय ॥ १ ॥ किंवा हळूंच माझ्या मागें, येउनि अवचित अटपुनि अंगे, माझीं झांकिल अति अनुरागें, नयनें ती काय ॥ २ ॥ उत्तरुनि गच्चीवरी भयानें, शंकितशंकितबहु विनयानें ॥ सुभ्रूसस्मित वरिवरि मानें, नानू करिताना ॥ ३ ॥ चतुरसखीनीं जागे जागे, ह्मणतां, सरतां मागें मागें बळें ढकलितां भरोनि रागे, येइल मज पाशीं ॥ ४ ॥

चित्र.-गड्ये, उर्वशी, याचा हा मनोरथ पूर्णकर.

उर्व.-बरेंतर, क्षणभर मौन करत्यें. (असें बोलून भीत भीत राजाच्या पाठी मागून येऊन दोन्हीं हतांनीं राजाचे डोळे झांकते).

चित्र-(नाकावर अंगुली ठेवून विदूषकास खूण करते).

राजा--(स्पर्श ओळखून) मित्रा, नारायणाच्या मांडी पासून उत्पन्न झालेली जी स्त्री तीच तर नव्हे कायरे ही ?

विदू.-तुला कसें समजलें तीच ह्मणून ?

राजा—अरे, यांत समजावयाचें तें काय ?

आर्या.

अनंगसंतप्तांगावरि हे रामां
च्याचें कवच
झालें सुख ही सांगायाला माझें
प्रसरे ॰वच ॥ १ ॥
चंद्रकरानीं विकसित संतत
कुमुद. नतें रवि किरणीं ॥
विकास पावे कदापि, अतुला
तीच असे सुररमणी ॥ २ ॥

चित्र.-काय बाई हें आश्चर्य ! जसे वज्रलेपानें चिकटून बसावे तसे हे माझे दोन्ही हात चिकटून बसले आहेत हे माझ्यानें सुटत नाहींत. (असें बोलून राजाच्या डोळ्यावरून हात काढून डोळे मिटून भीत भीत उभी रहाते आणि धैर्य करून पुढें येऊन ह्म०) महाराजांचा जयजयकार असो

चित्र—महाराज, खुशाल आहांना ?

राजा-आतांच खुशाल झालों.

उर्व.-सखी, राणीनें महाराज मला दिले आहेत, ह्मणून मी महाराजास अगदीं खेटून बसलयें आहें, ह्मणून तूं मला दांडगी ह्मणूंनको बरें.

विदू-हें काय ? अरे तुझ्या दोघांस येथेंच सूर्यास्त झाला काय ?

राजा-(उर्वशीं कडे पाहून).

दिंड्या.

सखे, देवीनें दीधलों तुला आतां
ह्मणुनि माझ्या वपुवरी करिशिसत्ता ॥ १ ॥
प्रथम कोणाच्या मतें प्रिये, त्वांगे
चित्त माझें चोरिलें प्रिये, सांगे ॥ २ ॥

चित्र-महाराज, आपल्या ह्या बोलण्यावर ही निरुत्तर झाली आतां माझी विनंती ऐकावी.

राजा.-बोलावें, मी सावधान आहें.

चित्र.-वसंत ऋतू लागल्या नंतर मला सूर्य नारायणाच्या सेवेलागलें पाहिजे या करितां इतकी च प्रार्थना आहेकीं, माझ्या प्रियसखीला जशी स्वर्गाची उत्कंठा लागणार नाहीं तसें महाराजानीं हिजपाशीं वर्तन करावें.

वेदू.–उत्कंठा लागायाजोगतें स्वर्गांत आहे काय दगड ? खायालानपियाला. तेथें माशासारखे डोळे उघडे ठेऊन एका मेकाच्या तोंडाकडे टकमक पहात बसावें ह्मणजे झालें.

राजा—मित्रा, आर्या.

स्वर्ग सुखाची विस्मृति, पाडि
ल नरकोणतां जगीं पाहे ॥
परिइतरस्त्रीदुर्लभ दासहिचा
हा पुरूरवा आहे ॥ १ ॥

पद.

स्वर्गींचें सुखसांगाया, सखयारे नपुरेवाणी, यागादिसुकृतें करुनी, जाताति तेथें प्राणी ॥ ध्रुवपद ॥ अंगणें चिंतामणिचीं मंदिरें मणिमय असतीं ॥ चांदवे शुभ्र तयाला. मोत्यांच्या जाळ्या लसती अमृताचें भोजन सुरस, पंक्ती वरि पंक्ती उठती ॥ रत्नांचे सोज्वळ दीप, बहु तेथें लखलख जळती ॥ अप्सरा आनंदानें, नाचती गाती हसती ॥ १ ॥ स्वर्गींचें सु

ख० ध्रु० ॥ नंदनीं कल्पतरूंचीं वृंदें हीं जागोजागीं, रमणीशीं प्रमुदित असती, वृंदारक बहु अनुरागी ॥ १ ॥ मंदमंद गंध वहाच्या, लहरी ही लागति आंगीं सुमनांचीं मृदुमृदु शयनें, पहुडती त्या वरि भोगी ॥ २ ॥ स्वर्गीचें सुख ॥ ध्रु०॥ स्वर्गाची विस्मृति हिजला, माझ्यानें क रवे कैशी ॥ तरिही मीनसुलभ इतर, नारिला तो हिजपाशी ॥ राहीन होऊ न दास, सर्वदा पदसेवेसी ॥ प्रेमानें दा नें मानें, बद्ध मी सद्गुणपाशीं ॥ ३ ॥ स्व र्गीचें सुखसांगाया, सखयारे नपुरेवाणी याागादि सुकृतें करूनी, जाताति तेथें प्राणी ॥ ध्रुव० ॥

चित्र—महाराजानीं माझी विनंति ऐकिली हा एक मजवर मोठा अनुग्रहच झाला. (उर्वशीस ह्म० गडये, उर्वशी, आतां खुशाल आनंदानें रहा आणि मला निरोप दे.

उर्व-(चित्रलेखेस दृढ आलिंगन करून गोरें मोरें तोंड करून) गडये, चित्रलेखे, मला विसरणार नाहींसना ?

चित्र.-(हसून) सखी, आतां तुझा आणि महाराजां-
चा समागम झाला या मुळें तूं मात्र मला वि-
सरूंनको अशी मी तुझी प्रार्थना केली पाहिजे.
(असें बोलून राजास नमस्कार करून जाते).

विदू—मित्रा, दैव योगानं तुझा मनोरथ पूर्णझाला
आतां उत्तरोत्तर आनंदाची वृद्धि असो.

राजा—खरें आहे, माझा मनोरथ पूर्ण झाला खरा.

श्लोक.

एकछत्र मही पतित्व, सखया
माझें असे, भूपती
सामंत स्वकिरीटरत्नकिरणीं
मत्पादपीठा प्रती
आर्तिक्यें करिती, कृतार्थ तरि
ही नाहींच झालों तसा
आज्ञाधारक होउनीच हिचिया
पायापशीं मीं जसा ॥ १ ॥

उर्व.-पराकाष्ठा झाली बाई या तोंडें माझ्यानें बोल-
वत नाहीं.

राजा.-(उर्वशीचा हात धरून) काय हा चमत्कार!

पूर्वीं जेजे इष्ट पदार्थ पहावे, तेते सारे दुःख कारक होत असत, आतां जी इष्ट पदार्थाची समृद्धि झाली आहे तीं सर्व सुखकारक आहे.

श्लोक.

शशिकर सुख माझ्या तेचि
गात्रास देती
स्मर शर अनुकूल स्वांतरीं
तेचि होती ॥
सुमुखि, विरस जेंजें वाटलें
वस्तु मातें
प्रिय सकळहि झालें संग
मानें तुझ्यातें ॥ १ ॥

उर्व.-महाराज, मला येण्यास विलंब झाला त्यामुळें आपणास फार दुःख झालें, हा मजकडून मोठा अपराध झाला.

राजा.-नाहीं नाहीं, असें नाहीं.

आर्या.

दुःखा नंतर जें सुख तें प्रिय
१२ बहु वाटतें मनालाया ॥

तप्तालाच विशेषें, सुखदायक
होतसे तरुछाया ॥ १ ॥

विदू.-अहो महाराज, तुह्मीं सायंकाळसंबंधी मनोरंजक चंद्रिकेचा अनुभव घेतला, आतां मंदिरांरांत प्रवेश करण्याची तुमची वेळ आहे.

राजा--तर मग तुझ्या मैत्रिणीला मार्ग दाखिव.

विदू.-असें असें इकडून यावें बाई साहेब. (असें बोलून इकडे तिकडे फिरतो).

राजा-सुंदरि, आतां माझी अशी इछा आहे.

उर्व.-कशी ती ?

राजा.- साक्या.

प्राप्त मनोरथ जेव्हां नव्हतों
तेव्हां मजला रात्री ॥
शतपट मोठी होउन गेली
अति दुःखाची दात्री ॥ १ ॥
तुझा समागम असतां, ती जरि
तशीच होइल रजनी ॥

दीर्घ, तरी मी होईन सखये
धन्य बहू आजि भुवनी ॥ २ ॥

(असे बोलून सर्व जातात.)

(तिसरा अंक समाप्त).

## विक्रमोर्वशीनाटक.

### अंक १.

### पात्रें.

चित्रलेखा ........... उर्वशीचीसखी.

सहजन्या ........ अप्सरा

राजा ................ पुरूरवा.

उर्वशी ............ अप्सरा.

# विक्रमोर्वशी नाटक.

## अंक ३.

(पडद्यांत सहजन्या आणि चित्रलेखा ह्यांच्या प्रवेशाचें सूचक गायन होतें).

### साक्या.

दिनमणि किरण स्पर्शें विकसित्त
तामरसें ज्या माजीं ॥
असती ऐशा सरोवरावरि, दोन
सखी ह्या आजी ॥ १ ॥
इष्टसखीच्या विरहें ह्यांचें चि
त्त ठिकाणीं नाहीं ॥
स्वसखी साठीं विव्हळ होती
न सुचे उपाय काहीं ॥ २ ॥

(तदनंतर सहजन्या आणि चित्रलेखा येतात).

चित्र—(प्रवेशानंतर द्विप दिकेनें पुढें येऊन दिशां कडे पाहून) ह्मणते.

साकी.

सरोवरावरि हंसीयुग्म स्निग्ध
सखीविरहानें ॥
गाळी नयनांतुनि अश्रू हें तळ
मळतें दुःखानें ॥ १ ॥

सह.-चित्रलेखे, म्लान कमला सारखी कृष्णवर्ण तुझ्या मुखाची कांति झाली आहे या वरून तुझ्या त्हदयास कांहीं अस्वास्थ्य आहे असें दिसतें, याचें कारण काय ? हें मला सांग ह्मणजे तुझें दुःख वाटलें जाईल.

चित्र-(दैत्यानें) अप्सरांच्या कामाच्या पाळी प्रमाणें मी सूर्याच्या सेवेंत वर्तमान असतां माझी प्रिय सखी उर्वशी ह्या वसंत ऋतूंत मजपाशी नाहीं ह्मणून मला तिची उत्कंठा लागली.

सह—सखी, तुह्मा दोघींचें तसेंच परस्पर प्रेम आहे हें मला विदित आहे.

चित्र,-तदनंतर इतक्या दिवसांत नवल विशेष वर्तमान काय ह्मणून मी ध्यान दृष्टीनें पाहिलें, तों मला मोठें भय दृष्टी पडलें.

सह—कायगे बाईनें ?

चित्र-(करुणा युक्त होऊन) त्या राजर्षी कडून सर्व राज्याचा कारभार प्रधानावर सोंपवून त्याला घेऊन विहार करावया करितां गंधमादन पर्वता वर उर्वशी गेली होती.

सह—अहाहा, सखि, तशा प्रदेशावर जें विलास भोगणें त्यालाच भोग ह्मणावें, बरें मग ?

चित्र.-मग उदकवतीनामक विध्याधराची कन्या मंदाकिनीच्या तीरीं वाळूचे पर्वत करून क्रीडा करीत होती तिजकडे त्या राजर्षीनें क्षणभर न्याहाळून पाहिलें, ह्मणून माझी प्रियसखी उर्वशी रागावली.

सह.-अगोदर तिच्या प्रकृतीस हें सोसावयाचें नाहीं, तशांत तिची आणि त्या राजर्षीची प्रीति अत्यंत वाढली, मग तिला हें सहन कोठून होणार ? असो भवितव्या पुढें उपाय नाहीं.

चित्र--मग तिच्या भर्त्यानें तिची पुष्कळ समजूत केली तथापि तें नमानून भरताच्या शापानें मोहित होत्साती "ह्या वनांत कोणी स्त्रिया येतील तर स्थावरत्व पावतील" असा स्कंदाचा

शाप विसरून त्याच्या वनांत गेली आणि तत्काल अरण्यांतलि एका लतेच्या रूपाला पावली.

सह.-(खेद करून) अरेरे, काय सांगावें, कोणत्याही प्रकारानें दैवाची गति चुकत नाहीं हें खरें, नाहीं तर तसल्या रूपाचा तसा परिणाम व्हावा काय ? बरें, मग पुढें काय झालें ?

चित्र.-मग तो राजर्षी त्याच अरण्यांत " हिकडे उर्वशी असेल तिकडे उर्वशी असेल असें ह्मणून उर्वशी उर्वशी करीत रात्र आणि दिवस घालवीत आहे, तशांत जे आपआपल्या स्त्रिया सह वर्तमान आनंदांत आहेत, त्यांच्याही अंतःकरणास उत्कंठा करणारा असा हा मेघकाल प्राप्त झाला ह्या मुळें त्याची अवस्था काय होइल ती होऊ.

सह.-चित्रलेखे, त्या दोघांचा समागम होण्याचा कांहीं उपाय आहे काय ?

चित्र.-पार्वतीच्या चरणास लावलेला जो लाक्षारस त्या पासून झालेला जो संगममणि तो जर मिळेल तर उपाय आहे. त्यावांचून दुसरा उपाय नाहीं.

सह.-चिंता नाहीं तसेजे असतात त्यांस दुःख प्रा-

प्त झालें तरी तें फार दिवस रहात नसतें या वरून दुःख मोचन होण्यांचे कारण असा कांहीं तरी समागमाचा उपाय प्राप्त होईलच यांत संदेह नाहीं तरमगये, आपण ह्या उदयाचलस्थितसूर्याचें उपस्थान करूं (असें बोलून दोघी जातात) (तदनंतर खंडधारा).

## साकी.

चिंता व्याकुळ व्हृदय सहचरीं
दर्शनलालस झाली ॥
विकसितकमलसुरम्यसरीं क
रि विहारविरसमराली ॥ १ ॥

असें बोलूनजात) (प्रवेशक) (पडद्यांत पुरूरव राजाची प्रवेशाची सूचना).

## श्लोक.

हा, हस्तिनाथ गहनीं शिरतो प्रियेच्या
होऊनि मत्त विरहें, विकृती मनाच्या
दावी, करोनि उघड, द्रुमपुष्पपत्रीं
जो आपुल्या करि विभूषण सर्वगात्रीं ॥१॥

शाप विसरून त्याच्या वनांत गेली आणि तत्काल अरण्यांतलि एका लतेच्या रूपाला पावली.

सह.-(खेद करून) अरेरे, काय सांगावें, कोणत्याही प्रकारानें दैवाची गति चुकत नाहीं हें खरें, नाहीं तर तसल्या रूपाचा तसा परिणाम व्हावा काय ? बरें, मग पुढें काय झालें ?

चित्र.-मग तो राजर्षी त्याच अरण्यांत " हिकडे उर्वशी असेल तिकडे उर्वशी असेल असें ह्मणून उर्वशी उर्वशी करीत रात्र आणि दिवस घालवीत आहे, तशांत जे आपआपल्या स्त्रिया सहवर्तमान आनंदांत आहेत, त्यांच्याही अंतःकरणास उत्कंठा करणारा असा हा मेघकाल प्राप्त झाला ह्या मुळें त्याची अवस्था काय होइल ती होऊ.

सह.-चित्रलेखे, त्या दोघांचा समागम होण्याचा कांहीं उपाय आहे काय ?

चित्र.-पार्वतीच्या चरणास लावलेला जो लाक्षारस त्या पासून झालेला जो संगममणि तो जर मिळेल तर उपाय आहे. त्यावांचून दुसरा उपाय नाहीं.

सह.-चिंता नाहीं तसेजे असतात त्यांस दुःख प्रा-

ष्ट झालें तरी तें फार दिवस रहात नसतें या वरून दुःख मोचन होण्याचे कारण असा कांहीं तरी समागमाचा उपाय प्राप्त होईलच यांत संदेह नाहीं तरमगये, आपण ह्या उदयाचलस्थितसूर्याचें उपस्थान करूं (असें बोलून दोघी जातात) (तदनंतर खंडधारा).

साकी.

चिंता व्याकुळ व्हदय सहचरी
दर्शनलालस झाली ॥
विकसितकमलसुरम्यसरीं क
रि विहारविरसमराली ॥ १ ॥

असें बोलूनजात) (प्रवेशक) (पडद्यांत पुरूरव राजाची प्रवेशाची सूचना).

श्लोक.

हा, हस्तिनाथ गहनीं शिरतो प्रियेच्या
होऊनि मत्त विरहें, विकृती मनाच्या
दावी, करोनि उघड, द्रुमपुष्पपत्रीं
जो आपुल्या करि विभूषण सर्वगात्रीं ॥१॥

(तदनंतर आकाशांत लक्ष्य लावून उन्माद युक्त राजा येतो).

राजा—(क्रोध युक्त होऊन) अरे, दुरात्म्या, राक्षसा, उभारहा उभारहा माझ्या प्रियेस घेऊन जातोस कोठें ? कसें, हा पर्वताच्या शिखरावरून आकाशांत जाऊन मजवर बाणाची वृष्टि करीत आहे ? असें बोलून हतांत मातीचें ढेकूळ घेऊन मारावयास धावून आणि दिशाकडे पाहून).

साकी.

सरोवरीं निजकांता दुःखें थर
थर कांपवि पक्ष ॥
हंसयुवा बहुतप्त होउनी तड
फड करि बाष्पाक्ष ॥ १ ॥

(विचार करून दयेनें) कसें ?

श्लोक.

आहे हा नवमेघ उत्थित, नव्हे
उन्मत रात्रिं चर
हें आकृष्ट न तच्छरासन, धनू
वृत्रारिचें हें वर ॥

ह्या धाराच, परंपरा मजवरी ये
ती नबाणाचिया
ही विद्युत्कनकापरी चमकते.
नाहीचती मत्प्रिया ॥ १ ॥

(असें बोलून मूर्छित होऊन खालीं पडतो)
(पुन्हा उठून उसासा टाकून).

साकी.

कळलें, मृगनयनेला कोणी राक्ष
स नेत असेहा ॥
नव्हे नव्हे, नव विद्युल्लतेस ज
ल दश्यामल नेहा ॥ १ ॥

(असा दैत्यानें विलाप करून आणि विचार करून)
तर मग ती कोठें गेली असेल बरें ?

साक्या.

निज प्रभावें गुप्त होउनी कोपें
कोठें बसली ॥
असें ह्मणावें, तरिती दीर्घक्रो
धी नाहीं तसली ॥ १ ॥

उडूनि गेली स्वर्गीं असें ह्मणू
तरी हें न घडे ॥
प्रेमरसानें आर्द्र तिचें मन मज
शीं कधीं न बिघडे ॥ २ ॥
पुढें माझिया असतां तीचें हरण
कराया नसतो ॥
समर्थ देव द्वेषी दैत्यहि, काहीं
नचलेच मती ॥ ३ ॥
ऐसें असतां कशी अगोचर नय
ना झाली, हाय ॥
माझी कैशी दैवगतीही करूं
तरी मी काय ॥ ४ ॥

(हिकडे तिकडे फिरून दिशाकडे पाहून उसासा टाकतो आणि डोळयास अश्रू आणून) अहो, असेंच आहे कीं, ज्याचें दैव फिरलें त्याचें दुःख वाढून ठेविलेंच असतें कारण.

श्लोक.

अकस्मात् मला हा प्रियेशीं वियोग
असे प्राप्त, जैसा विपाचा प्रयोग ॥
अशा माजि सच्छाय हा मेघकाळ

यमातुल्य यावा ? कसें हें कपाळ ॥ १ ॥

श्लोक.

मेघा माझी तूतें अज्ञा. आटोपी
तूं क्रोधा प्राज्ञा ॥
काष्ठापूर्णा धारापातें, त्वां,कां पी
डा देशी मातें ॥ १ ॥

हे मेघराजा, मी सर्व पृथ्वीभर भ्रमण करीत असतां जर कोठें माझी प्रिया पाहीन तर तूं मला जी जी पीडा देशील तीती मी सोशीन (चर्चरिका गानानें अमळ विचार करून) माझ्या अंतःकरणास हा मेघकाल अत्यंत पीडा देत आहे हिची मी व्यर्थ उपेक्षा करीत आहे कारण मोठे मोठे मुनी असें ह्मणतातकीं राजा कालस्य कारणं, असें असतां मी ह्या मेघकालाचें निवारण कां नकरावें ?

साक्या.

अलिकुल गंधो न्मादित होउनि
मंजुल मंजुल गातें ॥
वाजवितें हें कोकिलकुल कल श
ब्द मधुर वाद्यातें ॥ १ ॥

पवनस्पर्शें किसलय पसरुनि
कल्पतरू हालतसे ॥

(असें नृत्य करून) अथवा मेघकालाचें निवारण करूंनयें, कारण ह्या मेघकालाच्या चिन्हानींच सांप्रत मला महाराजोपचार होत आहेत (हसून)

पद.

अइकाहो जल धरसमय, उपका
रक मजला झाला ॥ ध्रु०
राज्याचे दिधले याणें सर्व भोग
भोगायाला ॥
प्रियसखी रहित तें राज्य, नाव
डेच महदयाला ॥

चालबदलून.

राहिन येथंची आतां, जोंवरि
येवोनी कांता ॥
दाखवील निजवदनाला ॥ १ ॥
अइकाहो ध्रु०
मंदिरेंचि सुंदर येथें, तरुवल्ली स
र्वहि असती ॥

अभ्र हेंचि छत्रवरि दिधलें, वि
द्युत्तति लखलख करिती ॥
तेंचि होत कनकरसाचे, वरि बिं
दू सुंदरसाचे ॥
नक्षत्रें हीरक त्याला ॥ अइ० ध्रु.
निचुलद्रुम शाखाहस्तें, मंजरी
च चामर पुंज ॥
वारितात, उपलचि माझें सिं
व्हासन रम्य निकुंज ॥
शय्या गृह बहुत सुखाचें, या पु
ढें मज शतमखाचें ॥
पद तृण होय मनाला ॥ ३ ॥
अइकाहो ध्रु०
ग्रीष्मर्तू खरतरसरतां, मधुरस्व
र मोर समोर ॥
बंदिवृंदबांधुनिछंदें, अपदानचि
गाती थोर ॥ चाल०
गिरिवरहेनैगम होती, वसुधारा
आणुनि देती ॥

१ अशोक २ इंद्र ३ प्रसिद्धकर्म ४ व्यापारी वाणी ५ वसु म्ह० धन पक्षी जल.

नृपसुख मज हेंचि मनाला ॥
अइकाहो जल धर समय, उप
कारक मजला झाला ॥
राज्याचे दिधले याणे, सर्व भो
ग भोगायाला ॥ ध्रुवपद ॥ ४ ॥

पुनःचर्चरी) असो, राज्य सामग्रीच्या श्लोघपासून काय फळ आहे ह्या अरण्यांत माझी प्रिया नाहिशी झाली आहे तिचा शोध करतों.

दिंड्या.

लागलासे विरह हा पृष्ठभागीं,
पळूं जातां येतसे ज्याड्य अंगीं ॥१॥
प्रिया विरहें अत्यंत दुःख भोगी,
पायनुचले विवळतो फार रोगी ॥२॥
रम्य पुष्पीं गिरिवनीं फिरत आहे
फार झाला गजपती क्षीणपाहे॥ ३ ॥

(तदनंतर द्विपदिकेनें हिकडे तिकडे फिरून पाहून हर्षानें) माझ्या उद्योगास उत्तेजन आलें.

श्लोक.

मधें कृष्ण, आरक्त जीं प्रांत देशीं,

प्रसूनें तयानीं अरण्य प्रवेशीं ॥
स्मृती कंदलींही नवी देइसाची
सकोप प्रियेच्या मला लोचनाची ॥१॥

आतां माझी प्रिया कोणत्या वाटेनें गेली, हें मला कसें समजेल ? कारण.

साक्या.

वन भूमीवरि पडली वृष्टी, धूली
सकलहि भिजली ॥
सुतनू जरि ह्या भूमी वरुनी,
चालत गेली असली ॥ १ ॥
तरि पदपंक्ती नितंबभारें,
मागें सखोल असती ॥
लाक्षारसचिन्हित ती मजला,
स्पष्टन कैशी दिसती ॥ २ ॥

द्विपदिकेनें हिकडे तिकडे फिरून पाहून) वाहवा वाहवा चांगलें झालें ज्या चिन्हावरून प्रियेच्या मार्गाचें अनुमान करतां येईल असें चिन्ह सापडलें.

अंभग.

गोरें मोरें करुनि वदन, प्रिया पुंढोनी रोदन, करतांकरतां रागें रागें, पाय टाकुनि जातां मार्गें, ॥ १ ॥ गळतांगळतां अश्रुधारा, ओष्ठरंग धुतला सारा॥ वस्त्र स्तनाचें भीजलें, तेंच आहे येथें पडलें ॥ २ ॥ जरीचे हे बूट त्याचे, चमक मारीती सोन्याचे, शुकाचीयें उदर हिरवें, जैसें तैसें दिसतें बरवें ॥ ३ ॥

असो, हतानें उचलून घेऊन पाहूंतर खरें (हिकडे तिकडे फिरून विचार करून डोळयास अश्रू आणून) अ:, येथें केवळ जमीन आहे आणि इंद्रगोप आहेत अशा गहन अरण्यांत प्रियेचा शोध कोठून लागणार ? (पाहून) बरें, वृष्टीनें स्वछ झालेलें असें हें पर्वताचें तट आहे त्यावर हा मयूर बसला आहे.

आर्या.

अत्युन्नतकंठानें, केकागर्भें
मयूर जलदातें ॥

पाहे, कलाप ज्याचा, नर्तित आ
हे महापुरी वातें ॥ १ ॥

असो, ह्याला पुसून पाहूं (तदनंतर खंडक).

साक्या.

शत्रुनिवारण पळांत करिजो, सां
प्रत भान न त्याला ॥ १॥
प्रिया दर्शनींलालस होउनि
गजपति विस्मित झाला ॥ १ ॥
पक्षिवरा तुज मोरा, प्रार्थी हा
जन फारचि दीन ॥
कांते वांचुनि तळमळ करितो उ
न्हांत जैसामीन ॥ २ ॥
फिरतां फिरतां वनीं तुझ्या जरि
कांता असेल दृष्टी ॥
पडली, तरि मज सांग लवकरी,
चित्त बहूतचि कष्टी ॥ २ ॥
अईक लक्षण तीचें, विशाल नय
ना शशांक वदना ॥
हंसगती, हें कथिलें आतां निव
वी सांगूनि मना ॥ ३ ॥

(चर्चरिकेनें खालीं बसून अंजलिपुट करून).

श्लोक.

नीलकंठा, मदुत्कंठा हरी सांग,
फलस्तनी॥
दीर्घापांगा सुमृद्वंगी, पाहि
ली काय तूंवनीं ॥ १ ॥

(चर्चरिकेनें बसून पाहून) हें काय बरें ? हों समजलों.

श्लोक.

अस्पर्धी, अजि मत्प्रिया हरपतां
झाला, ह्मणोनी जना
देतो सांद्रकलाप मंदपवनें प्रोत्फु
ल्ल हा रंजना॥
पुष्पालंकृत केशपाश सुटतां नी
लालकेचा कृती
याची कोणतयापुढें मगजगीं
मानी प्रतिष्ठा अती ॥ १ ॥

असो, हा बेटा पर दुःखानें सुख पावणारा आहे ह्याला पुसून उपयोग काय ? (दिशा कडे पाहून)

अहो, ही कोकिला ह्या जंबू वृक्षाच्या शाखेवर बसली आहे, हिचा मद ग्रीष्मऋतूनें समाप्त ाला आहे हिला पुसून पाहूं बरें.

## आर्या.

(तदनंतर खुरक).

विद्याधरकाननीं प्रियेच्या विर
हें झाला लीन ॥
ज्याच्या नयनीं वाष्प पूरये, फा
रचि आहे दीन ॥ १ ॥
जिकडे तिकडे गजेंद्र फिरतो भ्र
णतो कांता कांता ॥
प्रिया शुद्धि मज सांगुनि कोणी
करा करा दुःखांता ॥ २ ॥

(वलंनिकेनें) साक्या.

अइक कोकिले. मधुरा लापे गो
ड बोल मज संगें ॥
स्वछंदानें नंदनवनांत फिरतां
नां गतिभंगें ॥ १ ॥
प्राणसखी मत्कांता तुझिया ह

ष्टी पडली काय ॥
सांग मला परभृतिके बाई, मो
कलितों मी धाय ॥ २ ॥

(असें बोलून नर्तन करून गुडघे भूमीस टेकून बसून) बाई कोकिले,

साक्या.

मजुल लापते कोकिल महिले तु
जला बोलति कामी ॥
रतिपतिदूता निपुण असशि तूं
मानवतीच्या सामीं ॥ १ ॥
मान विनाशक अमोघ अस्त्रचि
तूं मत्समीपतिजला ॥
आणी, अथवा कांता जेथें तेथें ने
ई मजला ॥ २ ॥

(वामकानें थोडा सावळून आकाशांत) काय? तूं इतका तिजवर अनुरक्त असून ती तुला टाकून गेलीकशी? असें ह्मणतेस (पुढें पाहून) बाई, ऐक.

श्लोक.

चुकी झाली असें कधिंहि मजला
न स्मरतसे
तरी ही क्रोधातें मजवरि वृथा
ती धरितसे ॥
स्त्रियांचें स्वामित्व प्रियजनिं अ
से, कारण तया
न कोपाया लागे पतिवरि, तरी
त्याच सदया ॥ १ ॥

(गडबडीनें मांडी घालून बसून तदनंतर भूमीस गुडघे टेकून चुकी झाली हा पूर्वोक्त श्लोक ह्मणून आणि पाहून) काय, माझ्या गोष्टी कडे लक्ष्य न देतांही आपल्याच व्यासंगांत निमग्न आहे! अथवा यांत आश्चर्य काय ? लोकांत ह्मण आहे ती खरी आहे.

श्लोक.

मोठें ही परदुःख थंड, ह्मणही
लोकीं तसें हें असे
दुःखी मी असतां पहा विनवणीं

हा नाइके हें कसें ॥
प्यायाला अधरा समा अभिन्न
वाही पक्व जंबूफला
मत्स्नेहान गणूनि उद्यत असे
केशी मदांधाखला ॥ १ ॥

असें आहे तरी माझ्या प्रियेच्या शद्वा सारखा हिचा शद्व मधुर आहे ह्मणून हिजवर कोप करणें योग्य नाहीं, बाई, कोकिले, तूं सुखी ऐस आह्मी आपल्या उद्योगास लागतों. (असें बोलून उठून द्विपदिकेनें पाहून) अरे, ह्या दक्षिणे कडील अरण्यांत माझ्या प्रियेच्या चरणांतील नूपुराच्या शद्वा सारखा शद्व ऐकूं येत आहे याचा शोध करूं बरें (ककुभेन षडु पभंगाः).

दिंड्या.

प्रिया विरहें जाहला म्लनवद
न, सतत ज्याचे अश्रुनीं
भरित नयन ॥ १ ॥ असहदुः
खें जो असे स्खलित गमन ॥
अंग अत्यंत तापलें नव्हे शम
न ॥ २ ॥ दुःख भोगी गिरि न

दीदरी माजी, करित आहे क
रिवर भ्रमण आजी ॥ ३ ॥

(द्विपदिकेनें पुढें येऊन दिशाकडे पाहून).

दिंड्या.

प्रिया कारिणी सोडूनि ज्यास गेली, त
नू ज्याची शोकाग्निदीप्त झाली १ ॥
अश्रुधारा लोचनीं सतत वाहे, करी
होऊनि व्याकुळ भ्रमत आहे ॥ २ ॥

(दैत्यानें) हरहर, काय हें दुःख ?

श्लोक.

मेघश्यामा सकळहि दिशा पाहु
नी हंसपक्षी
उत्कंठेनें ललित गतिनें मानसा
तेंच लक्षी ॥
जातां जातां मधुर तर हा होत
से शद्ब त्याचा
नाहीं नाहीं ध्वनि मधुर त्या भा
मिनी नूपुराचा ॥ १ ॥

द्यावें, ह्मणोनि कथिला आहे
शास्त्रीं न्याय असार ॥ २ ॥

(पुनःचर्चरी) हंसा, बोल बोल ही सविलास गति तूं कोणापासून घेतली ? (प्रथम गोडीनें मऊपणानें मागून तदनंतर रोषानें मागून पाहून) राजा चोराचें शासन करीत असतो असें समजून हाभेउन उडून गेला तर मग आतां दुसरेकडे जाऊन शोध करूं (द्विपदिकेनें हिकडे तिकडे फिरून पाहून) हा चक्रवाक प्रियेसहवर्तमान बसला आहे ह्या जवळ जातों.

दिंड्या.

वृक्षपुष्पें आणीकपल्लवानीं, यु
क्त जेथें मर्मर ध्वनितरानीं ॥ १ ॥
त्यांत करितो करिवर भ्रमण दयि
ता, वियोगानें कष्टला हाय करितां ॥ २ ॥

(द्विलयांतरेचचरी) दिंड्या.

देखिली कीं सांगरे चक्रवाका,
घसाझाला मारितां शुष्क हाका ॥ १ ॥
वसंताच्या वासरीं वनीं आली,

क्रीडनाला. मत्प्रिया गुप्त झाली ॥ २॥

चर्चरिकेनें भूमीस गुडघे टेकून)

श्लोक.

रथांगश्रोणिनें त्यक्त हा रथी पुसतो तुला ॥
मनोरथ शतें युक्त, याच्या पुरवि हे तुला॥१॥

हा तर, "कःकः" असा शद्ब करीत आहे, काय चमत्कार ! मी कोण हें याला ठाऊक नाहीं काय ?

आर्या.

रवि ज्याचा माता मह, चंद्र पि
ता मह, जया स्त्रिया असती ॥
दोघी, एका व सुधा, दुसरी स्त्री
रत्न उर्वशीच सती ॥ १ ॥

काय ! हा उगीचच बसला, कांहींच उत्तर देत नाहीं असो, याला अंमळ फजीत करूं बरें (भूमीस गुडघे टेकून बसून) अरे चक्रवाका, आपल्या अनुभवा वरून दुसऱ्यांचें दुःख ओळखावें, हें योग्य कारण.

गीत.

कोठे गेली माझी कांता, सांग रथांगा करुणावंता ॥ निववीलवकरि तप्तस्वांता, तद्दुदंतामृतदानें[1] ॥ १ ॥ बोल बोलवा तोंड उघडुनी, बसूं नकोरे मुका होउनी ॥ विरह वेदना तूंचि समजुनी, न जाणशी कैसा ॥ २ ॥ सरोवरीं तूं स्वयें सहचरी, कमलदलेंही झांकुनि दूरी मानुनि तिजला कसा अंतरीं, तळमळशी पाहें ॥ ३ ॥ उत्कंठित तूं फारचि होशी, स्वप्राणातें कंठीं धरिशी ॥ अरडुनि अरडुनि हका मारिशी, कांतेसाठीं तूं ॥ ४ ॥ जायासह हें विहंग राया, तिजविण तुजला दुसरें ठायां भीरुपणा किति वासकराया, अनुभविशी ह्रदयीं ॥ ५ ॥ अपुल्या वरोनि पर दुःखातें, ओळखुनीयां ह्या विधुरातें ॥ मत्कांतेच्या वृत्तांतातें, न सांगशी कैसा ॥ ६ ॥

---

१. तिचा उदंत ह० वर्ता तिच्या दानानें.

(बसून) मला असें वाटतें कीं सर्व प्रकारें माझें भाग्य फिरलें, त्याचा हा प्रताप आहे, असो, आतां दुसरे कडे पाहूं (द्विपदिकेनें हिकडे तिकडे फिरून पाहून) अहो.

श्लोक.

हें[1]कंज मं[2]जुमधुपालिकलारवानें
शोधीमला, ललित आननसेंचिमाने ॥
[3]दष्टोष्ठ, मी चपलनेत्र, सुरम्य, तीचें
सत्कारयुक्त, सविलासकलावतीचे ॥ १ ॥

मी येथें शोध केला नाहीं असा मला पश्चाताप न व्हावा या करितां ह्या कमलाच्या बेटांत ह्या भ्रमराशीं स्नेह करून प्रियेचा शोध करितों (अर्द्धद्वि चतुरक)

साकी.

एक सारख्या गुरुतरवृद्धप्रेम
रसाने क्रीडा ॥
हंस युवा हा सरोवरीं करि पावे
अनंग पीडा ॥ १ ॥

---

१ कमल २ मंजुल भ्रमर पंक्तीच्या शद्वानें. ३ ज्याला दंशकेला हे असा आहे ओष्ट ज्याचा.

(चतुरस्त्रकानें बसून अंजलि पुट करून)

दिंड्या.

मदिरनयना पाहिली तुवां काय,
वद भ्रमरा किति करूं हायहाय ॥ १ ॥
सांग सुतनू शोध तूं बोध गेला,
रोध होऊन वृत्तिला स्तंभ झाला ॥ २ ॥
जरी नाहीं पाहिली ह्मणशि कांता,
तुझ्या अंगीं लावितों परिस आतां॥३ ॥
विदित नसता मन्मुख श्वासगंध,
पुंडरींकीं न असतासरागांध ॥ ४ ॥

(द्विपदिकेनें ह्रिकडे तिकडे फिरून पाहून) अहो ह्यानीपवृक्षा खालीं हा गजराज हस्तिनी सह वर्तमान बसला आहे, ह्याच्या जवळ जाऊन पुसूं बरें.

(कुटिलिका) साकी.

करिणीविरहें तप्त होउनी वनांत
गजपति आहे ॥
शिरीं जयाच्या मदलोभानें मधु
करतति उडताहे ॥ १ ॥

(आगखी पाहून) अथवा ह्याच्या जवळ जाण्याचा हा समय नाहीं कारण.

## आर्या.

नुकतीच उगवलेली, जवळी दि
धली प्रियाकराग्रानें ॥
आसवसुगंधरस ही अनुभवु
हा सल्लकी निजसुखानें ॥ १ ॥

(स्थानकेन दृष्ट्वा) ह्याचें खाणें झालें, आतां ह्याच्या जवळ जाऊन पुसावयास चिंता नाहीं. (त्याच्या जवळ जाऊन).

## साक्या.

ललित प्रहार करुनि लवविशी
तरुवर, करिकुलराजा ॥
मनास मोहक निर्जित शशिधर
कांती माझी भाजा ॥ १ ॥
तुवां देखिली असेल तरि मज
लवकरि सांग तुलामी ॥
पुसत असें बहु विनवुनि सविन
य कांतासंगम कामी ॥ २ ॥

(दोन पावलें पुढें येऊन).

साक्या.

समस्तरमणी मधें शशिकला
किंवा अनंगभामा॥
असे यूथिकाचित्रकेशजी स्थिर
यौवन मद्रामा॥ १ ॥
गज यूथपते, दृष्टिस तुझिया सु
खकर गोचर झाली॥
असेल तरि मग सांग मला जरि
असेल इकडे आली ॥ २ ॥

(हर्षानें ऐकून) प्रियेच्या प्राप्तीचें सूचक असें हें गंभीर गर्जित ह्याणें माझें समाधान झालें आणि तुजवर माझी प्रीति आहे, कारण तुझें आणि माझें साम्य आहे, कसें ह्मणशील तर ऐक.

श्लोक.

भूपालाधिप बोलती मज, तुला
[1]नागाधिराजा, समा
[2]दानाची सतत प्रवृत्तिहि तुझीमा

१ गजांचा राजा २ वितरणाची पक्षीं मदोदकाची

झी असे उत्तमा॥
स्त्रीरत्नांतहि उर्वशी प्रियतमा
माझी, तुझी ही वैशा
तूझें मत्सम सर्व, मात्र विरहें
पावूंनको मद्दशा ॥ १ ॥

कां ? सांगत नाहींस ? नको सांगू बाबा, बिचारा सुखी ऐस कसा अहो हा सुरभिकंदर नामक पर्वत आहे, हा अप्सरांस फार प्रिय आहे, ह्मणून ह्या पर्वताच्या अजू बाजूस कोठें माझी प्रिया [illegible] असेल तर पहाव (हिकडे तिकडे [illegible]रून पाहून) कसें करावें ? अंधकार तर फारच पडला आहे. असो, मधें मधें विजालवत आहेत त्यांच्या उजेडानें पाहीन आतां काय करावें? माझ्या अनंत जन्माच्या पापाचा परिणाम हा कसा आहे तो, उगाच विद्युल्लतांच्या प्रकाशानें पाहीन ह्मटलें तर मेघमंडलांत कोठें वीज देखील चमकत नाहीं, तथापि ह्या पर्वतावर तिचा शोध केल्या वांचून माघारी फिरणार नाहींच.

(अनंतरे खंडिका).

---

२ हस्तिनी.

साकी.

खरतरखुरदारितभूमी जो स्व
कार्यपरसूकर हा ॥
गहनवनीं स्थिर राहुनि फिरतो
होउनि लीन पहा ॥ १ ॥

श्लोक.

आली असेल विपिनीं तरि सांग मातें
तुंगस्तनी पृथुनितंबवती प्रियातें ॥
कामोद्भवें बहुत मंगल रूप आहे
तीचा वियोग मजला क्षणहीनसाहे। १।

हा काहींच बोलत नाहीं, हें कसें ? ह्याला आणि मला अंतर आहे ह्मणून ह्याला माझें बोलणें ऐकूं येत नाहीं, असें वाटतें, असो, ह्याच्या जवळ जाऊन पुसतों (असें बोलून अंजलि पुट करून).

साक्या.

स्फटिक शिला तल निर्मलनिझर
र तुजवरि फारचि असती ॥

बहु विध कुसुमें महीधरा तुझि
शोभा सुरम्य दिसती ॥ १ ॥
मधुर मनोहर सुस्वर किन्नर तु
जवर गीतें गाती ॥
श्रीमंता मी मागतसें तुज दावी
मला प्रियाती ॥ २ ॥

(चर्चरिकेनें जवळ जाऊन अंजलि पुट करून).

आर्या.

समस्तपर्वतनाथा, माझी स
र्वांगसुंदरी रमणी ॥
पाहिलि रम्यवनांतीं आली म
द्विरहिता स्त्रियांतमणी ॥ १ ॥

(पुन्हा आपल्या बोलण्या सारखा प्रतिध्वनि ऐकून हर्षानें) कसें ? मी विचारल्या प्रमाणें पाहिलेकीं, " असें ह्मणतो) असो, येथें तिचा शोध करूंन पाहूं (सर्व दिशे कडे पाहून खेदानें) हरहर, हा पर्वताचा शद्ब नाहीं तर माझ्याच शद्बाचा प्रतिध्वनि त्याच्या गुहेंत पसरला आहे. (असें बोलून मूर्छित होऊन खालीं पडतो आणि पुन्हा उठून बसून खेद युक्त होऊन खालीं

पडतो आणि पुन्हा उठून बसून खेदयुक्त होऊन हाय, देवा देवा, मला फार श्रम झाले, या करितां ह्या पर्वता जवळ ही नदी आहे तिच्याती रावर तरंगा वरून गारवारा येत आहे तेथें जाऊन मी विश्रांति घेतो (हिकडे तिकडे फिरून पाहून नव्या उदकानें गढूळ झालेल्या ह्या नदीस पाहून माझ्या अंतःकरणास संतोष होत आहे कारण.

साक्या.

तरंग असती भ्रूभंगचि हे, क्षुब्ध
विहंगश्रेणी ॥
हीच असे कलकांची, नलिनें लो
णी, भ्रमराचिवेणी ॥ १ ॥
जाणो फेनचि वसन शुभ्र हें त्व
रा भरानें शिथिल
जातां जातां झालें, कैशी चाल
तसे ही कुटिल ॥ २ ॥
पदों पदीं मजकडून घडली चू
क, न तो हिज साहे ॥
यास्तव माझी प्रिया घेउनी रू
प नदीचें आहे ॥ ३ ॥

बरें तर, आतां मी प्रार्थना करून हिला प्रसन्न करतों.

साक्या.

प्रसन्न होतूं अगे प्रियतमे सुंद
रि लगबग, नकरी ॥
तळमळ तळमळ बहुतचि करिम
न फुटत असेलाहि परी ॥ १ ॥
त्वरा भरानें सुरापगेला उत्सु
क तूं भेटाया ॥
परिही विहंग राजी त्वदर्थ मोक
लोनि बहु धाया ॥ २ ॥
जिकडे तिकडे कलकल करिते
अलिकुल नलिना वरतें ॥
बैसुनि जाणो तुझ्या वियोगें झं
कारातें करितें ॥ ३ ॥

(तेनकुटिलिकां तरे चर्चरी)

श्लोक.

घरीं येशी तूंगे ह्मणुनि जलधी ह
र्षित असे

पहा मेघांगानीं ललिततर हा
नाचत असे ॥
करोनी कल्लोल प्रचलित महा
पूर्व पवनें
वरी तेची बाहू अभिनय करी
हर्षित मनें ॥ १ ॥
वपूं शंखं चक्रें तिलक करुनी भू
षित करी
शिरीं हंसाकार स्फुट तर पहा
कुंकुम धरी ॥
कटील्याला नीलोत्पल वसन टा
ळी पिटितसे
जलोत्क्षेपें काष्ठा जलदहि पहा
झांकित असे ॥ २ ॥

पद.

प्रिये मी शरण असें तुजला, कांगे टाकितीस तूं मजला ध्रुवपद ॥ प्राणापरीस तूजवरी, प्रीती धरिली आजवरी ॥ मज ह्या दुःखाब्धींततरी तुजविण कोण असे दुसरी, होशी मा

झी जीवकला, कांगे टाकिती समजला ॥ १ ॥ ध्रु० कुसुमाहुनि जें सुकुमार. दुख वेल तुझें मन फार ॥ ह्मणुनि बोलिलों मी मधुर, तुजशीं वचन जेंचि सार ॥जीवितसंशय मज पडला, कांगे टाकिती समजला ॥ ३ ॥ तूजविण झालें चित्त उदास, देती सर्वहि भोगत्रास ॥ पाहुनि कोण्या अपराधास, मानिनि मोकलशी हा दास ॥ ४ ॥ विनवितां कंठ बहु सुकला, कांगे टाकिती समजला ॥ ध्रु०

ही कांहींच बोलत नाहीं हें कसें ? अथवा ही वास्तविक नदीच असेल, उर्वशी असती तर ह्या पुरूरव राजास टाकून समुद्राकडे कशी जाती ? असो, खिन्न होऊन उगीच बसणें योग्य नाही उत्साहानेंच सर्व कल्याण होत असतें या करितां आतां माझी प्रिया ज्या ठिकाणीं अदृश्य झाली त्याच ठिकाणीं मी जातों, (हिकडे तिकडे फिरून पाहून) येथें हा हरिण बसला आहे, ह्याची प्रार्थना करतों ह्मणजे हा माझ्या प्रियेची वार्ता सांगेल.

साक्या.

अभिनव पुष्प स्तबक मनोहर
तरुवर जेथें असती ॥
मदकलकोकिलकूजितज्याव
रि संतत करीत बसती ॥ १ ॥
नंदनविपिनीं त्या ऐरावतगज
निजकरिणीच्या हा ॥
विरहाग्नीनें तप्त होउनी फिरत
असे करि हाहा ॥ २ ॥

(पाहून).

श्लोक.

कृष्ण सारछवी जो हा दिसतो
पाडिला कसा ॥
नवसस्यें पहायाला, वन श्रीनें
कटाक्षसा ॥ १ ॥

श्लोक.

निजसमीप मृगी जंवयें, स्तनीं
लगटुनी स्तनिच्याशिशुनें वनीं
अडवितांचितदेकमना असे,

तिजकडे चकुरंगी पहातसे ॥ १॥

(इतिचर्चरी) श्लोक.

जघनभारसुमंदगती असे, पृथुल तुंगकुच द्वय होतसे ॥
गमन हंससमान, जिची तनू, कृश, तशा भ्रुकुटी असती धनू ॥ १ ॥
हरिण लोचनचंचललोचना, फिरतसे विपिनीं स्थिरयौवना ॥
निरखिलें असलें तिजलाजरी, झडकरीमज सांग मृगातरी ॥ २ ॥
विरहसागर दुस्तर हातिचा, बुडतसें, पडला निधि हातिचा ॥
कथुनि शोधचि पोत मलाकरी, धरुनि काढि मृगा मजलौकरी ॥ ३ ॥

(जवळ जाऊन) अहो हरिण नायका,

श्लोक.

सखी सारंगा तूं असशिल वनीं देखिलि जरी

१. नौका.

तरी सांगे मातें विरह व्यथिता
तें लवकरी॥
तिच्या चिन्हांतें तूं अइक, पृथु ने
त्रास हचरी
तुझी, तैशी तीही ललित अव
लोकें मन हरी ॥ १ ॥

हें काय! माझ्या वचनाचा अनादर करून आप ल्या स्त्रिकडेच हा चालला असेंच आहे. दैव फि रलें असतां कोणाहीपासून अपमान होतच असतो असो, मी आत्तां दुसऱ्या टिकाणीं जातों (असें बोलून हिकडे, तिकडे फिरून) अहो, तिच्या मा- र्गाची खूण सापडली.

श्लोक.

हातोचि रक्त सुविशाल कदंब ज्याचें
मधेंचि जें उमललें सुमतें कचाचें ॥
ग्रीष्मन्त बोधकर भूषण मत्प्रियेनें
केलें अपूर्ण रजही असतां तियेनें ॥ १ ॥

बरें, येथें ह्या दगडाच्या कपारींत तांबडें तांबडें लाल हें काय आहे?

---

१ पुष्प

श्लोक.

नाहीं सिंहहतेभमांस लव. कां,
तेजें बहू दीप्त हा
नाहीं हा अनलस्फुलिंग, पड
ली वृष्टी वर्नी ह्याम हा ॥
आहा ! दिव्य अशोकपुष्पस
महा आरक्त आहे मणी
सूर्यानें उचलावया करजणो, हे
लांब केलें झणी ॥ १ ॥

असो, उचलून घेतो (असें बोलून मणी घेतो).

श्लोक.

प्रणयिनीरातिनें दृढ बांधिला, नयन
वाष्प जळें बहुसिं चिला ॥
गजपती गहनांतसदुःखहा, फिरतसे,
सुकलें मुख हें पहा ॥ १ ॥

(द्विपदिकेनें पुढें येऊन मणि हतांत घेऊन म-
नांत).

श्लोक.

कल्पवृक्षपुष्पवासिता कचाव[1]री तिच्या
हा मणी विभूषणास योग्य रम्य कांतिच्या ॥
तीच सांप्रत प्रिया मला असे सुदुर्लभें
व्यर्थ हा मणी करूं कशास अश्रुनिष्प्रभ ॥ १ ॥

(असें बोलून मणि हतांतून टाकतो) पडद्यांत घेघे, वत्सा घे हा मणी टाकूनको.

आर्या.

संगमनीयमणी हा, दुर्गापद जनितराग संजनितराया ॥
हातीं धरितां सत्वर शक्त प्रिय जनसमागम कराया ॥ १ ॥

(राजा वर पाहून) हा कोण मला उपदेशक करीत आहे बरें ? पाहून हॉहॉ, असें काय ? हा

[1] कल्पवृक्षाच्या पुष्पानीं सुगंध अशाकचावर ह्मणजे केशावर.

माझा पूर्वज नक्षत्रनाथ आहे भगवान् ह्या उपदेशानें मजवर आपला मोठा प्रसाद झाला (असें बोलून मणि हतांत घेऊन हें संगममणे.

श्लोक.

झाला वियोग मजला तनु मध्यमेचा
देशील संगम करूनि जरी तियेचा ॥
जैसा महेश्वर धरी स्वशिरीं विधूतें
तैसा मणे धरिन मी स्वशिखेंततू तें १

(हिकडे तिकडे फिरून पाहून) बरें, ही लता पुष्प रहित असून हिला पाहून माझी हिजवर इतकी प्रीति कां होते? अथवा हिला पाहून माझें मन रममाण आहे हें युक्तच आहे कारण कीं, ही.

साकया.

अश्रुजलानें अधर सखीचा, मा
झ्या धुतला जैसा ॥
वल्लीचा ही पल्लव धुतला मेघज
लानें तैसा ॥ १ ॥
ऋतुकालाच्या अति क्रमें ही
पुष्प प्रादुर्भावें ॥

शून्य ह्मणोनी भूषणविरहित
मत्कांता जणु भावे ॥ २ ॥
चिंतेनें धृतमौनजणो ही, भ्रम
रध्वनि विण वाटे ॥
हीतें पाहुनि घडि घडि, माझा
कंठ बहूतचि दाटे ॥ ३ ॥
फार कुपितती झाली तेव्हां ती
चा समज कराया ॥
चुकलों चुकलों क्षमा करींगे ह्म
णोनि पडलों पाया ॥ ४ ॥
तरिही मजला डावलुनी ती कु
पित होउनी गेली ॥
वाटे माझी प्रियावनीं ह्या रुसो
नि झाली वेली ॥ ५ ॥

ही लता माझ्या प्रियेचें साम्य पावली आहे ह्मणून मला हिचें आलिंगन करण्याची उत्कंठा फार होत आहे.

श्लोक.

मजकडे लतिके करुणे पहा, कि
ति तरी मज दुस्तर खेद हा ॥

अइक तूं सखये वदतों तुला, पुनरपी
सुतनू अति कोमला ॥ १ ॥
विधि वशें जरि सापडली तरी, कधिं
न धाडिन मी विपिनांतरीं ॥
आणिक मीहि न जाइन, जाहलें, बहु
तशासन, चित्त दुःखावलें ॥ २ ॥

(असें बोलून चर्चकेनें जवळ जाऊन लतेचें आलिंगन करतो).

(तदनंतर लतेचा भेद करून उर्वशी बाहेर निघते)

राजा.-(डोळे मिटून चाचपून पहातो) अरे, उर्वशीच्या अंग स्पर्शानें जसें सुख व्हावें तसें मला येथें होत आहे त्यावरून उर्वशी येथें असेल असें वाटतें, पण भरवसा येत नाहीं कांकीं.

श्लोक.

प्रियेचें जेंजें मी प्रथम ह्र्दयीं
कल्पित असें
क्षणा मध्यें तेंतें सकळ उफराटें
घडतसे ॥

झणोनी नेत्रातें उघडुनि न पा
हीन सहसा
प्रियेच्या स्पर्शासें समजुनि अ
सें मी सुखितसा ॥ १ ॥

(असें बोलून हळूच नेत्र उघडून पाहून) अरे, खरो खरीच उर्वशी आहे (असें बोलून मूर्छित होऊन खालीं पडतो)

उर्व.-महाराज सावध व्हा सावध व्हा.

राजा.-(सावध होऊन) प्रिये, मी आजच जिवंत आहें असें वाटतें.

आर्या.

होतों बुडत तुझ्या मी, विरह स
मुद्रीं अशांत तूं मजला ॥
सांपडलीससकोपे, विगत प्राणा
स जेविजीवकला ॥ १ ॥

उर्व.-महाराज, मी कोपाच्या स्वाधीन होऊन आपणास असें दुःख दिलें, हा मजकडून मोठा अपराध झाला, याची क्षमा करावी.

राजा.-प्रिये, ह्या विषयीं माझी प्रार्थना करणे नको च कांकीं, तुझें दर्शन होतांच सबाह्याभ्यंतर मी संतुष्ट झालों आहें, आतां सांग सांग बरें तूं मज वांचून इतके दिवस कशी राहिलीस ? माझी तर दशा अशी झाली होती.

गीत.

प्राण सखीगे तुझिया साठीं, नदी न
दीच्या फिरलों काठीं जीव जंतुच्या ला
गुनि पाठीं. श्रमलों मी फार ॥ १ ॥ व
नीं वनीं मी वृक्षीं वृक्षीं, मजदीनातें र
क्षी रक्षी ॥ यापरि विनवुनि अनेक प
क्षी, सखये प्रार्थियले ॥ २ ॥ अलिकु
ल कोकिल हंसविहंग, शिखि, खग
नग मृग आणि रथांग, सेवियले मी
त्वदर्थ, संग, सर्वहि सोडोनी ॥ ३ ॥
स्थलचर जलचर सर्व प्राणी, पृष्ठनसे
मी रडुनि रडुनी ॥ नसे राहिला ऐसा
कोणी. सांगूं तुजकाय ॥ ४ ॥

उर्व.-खरें आहे महराज. आपली जी दशा झाली ती माझ्या अंतःकरणास प्रत्यक्षच आहे.

राजा.-प्रिये, अंतःकरणास प्रत्यक्ष असें ह्मणतेस याचा अर्थ मला समजला नाहीं.

उर्व.-ऐकावें महाराज, पूर्वी कार्तिक स्वामीनें अखंडित ब्रह्मचर्य घेऊन गंधमादन पर्वताच्या अकलुष नामक प्रदेशावर वास केला आणि अशी मार्यादा केली कीं,

राजा.-कशी ती ?

उर्व.-ती अशीकीं, जी कोणी स्त्री ह्या प्रदेशांत येईल ती लता होईल आणि पार्वतीच्या चरण संबंधी लाक्षा रसानें झालेला जो मणि त्यावांचून लतेच्या स्वरूपा पासून मुक्त होणार नाहीं ह्मणून जेथें कन्या जनानीं जावयाचें नाहीं अशा कार्तिक स्वामीच्या वनांत मी शिरल्यें, तोंच अरण्यांतील एक लता झाल्यें.

राजा.-प्रिये सर्व जुळलें.

आर्या.

रतिखेदें शयनींही निजल्या मजमानि
शी प्रवासस्थ ॥
दुस्तर वियोग साहुनि, कैशी तूं राहि
लीस गे स्वस्थ ॥ १ ॥

आणि पुन्हा आपली दोघांची भेट होण्याचें जें साधन तूं सांगीतलें, तेंही अनुभवास आलें, तें हें पहा. (असें बोलून मणि दाखवितो).

उर्व.-अहाहा, हाच संगनीय मणी काय? ह्मणून महाराजानीं माझें आलिंगन करतांच मी यथा पूर्व झाल्यें.

राजा.-(मस्तकावर मणी ठेऊन).

श्लोक.

हा मणी सखि ठेवितां तव म
स्तकां बहु राजस
शोभतो, वदनीं तुझ्या किति ते
ज हें पडलें असे ॥
त्यामुळें सुमुखी तुझें मुख गोजि
रें दिसतें तसें,
कोमला तपरक्त पद्म सुरम्य कां
ति दिसे जसें ॥ १ ॥

उर्व.-महाराज, आपलें भाषण केवळ अमृतच आहे असो आपण प्रतिष्ठान नगरांतून इकडे आलों, त्याला फार दिवस झाले ह्या मुळें प्रजा

आपल्यावर दोष ठेवितील, या करितां चला, आतां आपण नगरास जाऊं.

राजा.-प्रिये, जशी तुझी मर्जी असेल तसें करूं (असें बोलून दोघे उठतात).

उर्व.-आतां महाराजांच्या मनांत कोणी कडून चलावयाचें आहे ?

राजा.- श्लोक.

विद्युल्लता ध्वज जयास, नवीं विचित्रें
होतीं सुरारि धनु हींच अनेक चित्रें ॥
ऐसा विमान सम मेघ मला तयानें
ने, तूं विलास गमने स्वगृहीं क्षणानें १

दिंड्या.

प्राप्त झाला सहचरी योग ज्याला, म
नामाजी आनंद फार झाला ॥ १ ॥
शरीराला रोमांच दाट आले, मनो हेतू
सर्वही पूर्ण झाले ॥ २ ॥

हंस पक्षी स्वछंद विमानातें. पाउनी
हा करितसे विहारातें ॥ ३ ॥

(असे बोलून जातात.)

(चवथा अंक समाप्त).

# विक्रमोर्वशीनाटक.

## अंक ५.

### पात्रें.

राजा ............... पुरूरवा.
विदू ............... हास्य रस प्रधान राजाचा मित्र
कंचुकी ............... भालदार.
रेचक ............... किरात.
परिजन ...........
तापसी ............ ऋषिपत्नी.
कुमार ............... राजाचा.
उर्वशी ............ अप्सरा.
नारद ...............
रंभा ...............
स्तुतिपाठक.......

अंक ५.

(तदनंतर हर्ष युक्त विदूषक येतो).

विदू.-हीहीहीही, (असें हास्य करून) अहो, राजा उर्वशीसहवर्तमान नंदन वनांत त्यात्या रम्य स्थळीं विहार करून आपल्या नगरास आला, ही गोष्ट मोटी आनंदाची आहे सांप्रत मनोरंजन पूर्वक सर्व प्रजेस आपल्या आज्ञेंत ठेवून राज्य करीत आहे, तो राजाच आहे त्या अर्थी त्याला कोणतें ही कमी आहे असें नाहीं, पण अशा ऐश्वर्यांत एक संतान नाहीं. या मुळें फार वाईट वाटतें, तें जर ईश्वरकृपे करून होईल तर फार चांगलें.

तो आज काहीं पर्वकाळ आहे ह्मणून राणीसह वर्तमान गंगा आणि यमुना ह्यांच्या संगमांत स्नान करून नुकतांच महालांत गेला आहे, त्याच्या अंगास अनुलेपन करणाऱ्या त्याच्या स्त्रिया त्याला गंधपुष्पा दिकें करून अलंकार करीत आहेत अशांत मीही जातों, ह्मणजे मला ही कांहीं लाभ होईल. (इतक्यांत पड-

त शाद होतो) अरेरे, हा मणि, रक्ताळ्ळ वृंताच्या करंडयांत घालून नेत असतां त्याचें झांकण काढून मांसाच्या भ्रांतीनें उचलून गृधपक्ष्यानें भक्षिला, हामणी राजानें उर्वशीचा विरह झाल्या मुळें आपल्या मुकुटांत घालावयाच्या उद्देशानें वोजिला होता, आतां हें एक मोठें छचांड उपस्थित झालें, कारण त्या मण्यावर माझ्या मित्राची फार आवड आहे, म्हणूनच त्यामानिमा, अलंकार अंगावर पुरते न घालतांच हा आसनावरून उठला असो, आतां मी त्याच्या जवळ जातों (असें बोलून विदूषक जातो) (इति प्रवेशकः)

(तदनंतर राजा, विदूषक, कंचुकी रेचक आणि परिजन येतात)

राजा—रेचका, आर्या.

स्ववधार्थ कृत्य करुनी, हें, पक्षी
चोर तो कुठें गेला॥
पालक गृहींच जेणें, प्रथमचि चो
रुनि मणी कसा नेला ॥ १ ॥

---

झालेले आणि होणारे जे कथा भाग यांचा सूचक व त्याची योजनानी व पात्रांस रमवावी आणि प्रथमांकांत नसावी असा जो कथासंदर्भतो.

किरात.-हा पहा, मुखाग्रांत मण्याचें सूत्र धरून मणि प्रभेनें आकाशास रंगच देत आहे काय असा होत्सातां परिभ्रमण करित आहे.

राजा.-होय, हा माझ्या दृष्टी पडतच आहे.

आर्या.

घेउनि मणी मुखाग्रीं, धरुनि तें
याच्या सुवर्ण सुत्रातें ॥
मंडल धरितो, उल्मुकचक्रापरि
दावि कांति वलयातें ॥ १ ॥

विदू.-आतां ह्याची दया पुरे, हा बेटा अपराधी आहे, या करितां याचें शासन करावें हेंच योग्य आहे.

राजा.-खरें ह्मणतोसतूं, कोण आहे रे, माझें धनुष्य आणा धनुष्य.

परि--आज्ञा महाराज, असें बोलून जातो).

राजा-कायरे, हा ळंवडीचा[१] दुष्ट पक्षी इतक्यांत दिसेनासा झाला.

१ कोकिल.

विदूं.-इकडे पहा इकडे, ह्या दक्षिणेकडील बाजूस उडाला जळो याची आशा.

राजा.-(पाहून ह्या समयीं हा पक्षी.

आर्या.

विस्तृत कांति जयाची, अैशा
मणिनें दिशा मुखास अहा ॥
जाणो अशोक गुछें, करित असे
रम्य भूषणास पहा ॥ १ ॥

(इतक्यांत एक यवनी येऊन म्हणते) महाराज, हें धनुष्य आणि बाण.

राजा.-अः, आतां काय धनुष्याचा उपयोग ? तो पक्षी बाणाच्या टप्प्या पली कडे गेला पहा.

आर्या.

लोकोतर मणि नेला, पक्ष्यानें
दूर, शोभतो कैसा ॥
मेघाचा ढग येतां, रात्रीं मंगळ
न भामधें जैसा ॥ १ ॥

आर्या, तालव्या.

कंचुकी.-काय आज्ञा महाराज ?

राजा--नगरांतील लोकांस माझी आज्ञा सांगकी. सायंकाळीं वृक्षाच्या अग्रावर पक्षी वास करित असतात तेथें त्या दुष्ट पक्ष्याचा शोध करावा.

कंचु--आज्ञा महाराज (असें बोलून जातो).

विदू--अहो महाराज, आतां स्वस्थ बसून विश्रांति घ्या, तो दुष्ट पक्षी कोठे गेला कोण जाणें तो कांहीं तुमची आज्ञा मोजीत नाहीं आणि मणी टाकीत नाहीं. (दोघ खालीं बसतात).

राजा-मित्रा, श्लोक.

नेला खगें मणि सुरम्य ह्मणोनि काहीं
चितांत खेद सखया मजलागि नाही ॥
माझा प्रियेसहित संगम त्या मणीनें
केला ह्मणोनि झटतों इतक्या श्रमानें ।१।

कंचु.-(पडद्या बाहेर येऊन) महाराजांचा जयजयकार असो.

राजा—मित्रा, श्लोक.

जाणो. तुझा प्रखर रोषचि बाण झाला
त्याणेंचि पक्षि तनुभेद पळांत केला ॥
हा सापराध सहसा मणितें धरोनी
भूमीवरी खग असे पडिला मरोनी ॥ १ ॥

(सारे विस्मित होऊन पहातात).

कंचु.-महाराज, हा मणी चांगला धुवून आणिला आहे हा कोणास द्यावयाचा ?

राजा.-जा, जामदारखान्यांत नेऊन पेटींत ठेवायास सांग.

किरात.-आज्ञा महाराज, (असें बोलून मणी घेऊन जातो).

राजा.-(कंचुकीस) तारळ्या, हा बाण कोणाचा आहे हें तुला ठाऊक आहे काय ?

कंचु.-महाराज, ह्या बाणावर कोणाचें तरी नांव लिहिलें आहें पण अक्षरें मला पुरती दिसत नाहींत.

राजा.-हिकडे आण तो बाण पाहूं बरें.

केंचु.-(बाण राजाजवळ आणून देतो).

राजा.-(बाणावरील अक्षराचा विचार करतो).

विदू.-महाराज, विचार कशाचा करितां ?

राजा.-अरे. ऐक, बाणप्रहारकर्त्याचीं नामाक्षरें.

विदू.-हं, महाराज, मी एकाग्र होऊन ऐकतों.

राजा.-(वाचतो)

श्लोक.

पिता ऐल माता जयाची विशुद्ध
असे उर्वशी, जो कुमार प्रबुद्ध ॥
धनुष्मान् असे आयुनामा, तयाचा
शर प्राण हर्ता समस्ता हितांचा ॥ १ ॥

विदू.-वाहऽवा, तुह्मांला संतानवृद्धि झाली ही मोटी आनंदाची गोष्ट झाली.

राजा.-मित्रा, हें कसेंरे ? नैमिषारण्यांतलि यज्ञां वांचून उर्वशी निरंतर माझ्या जवळच असे, पण उर्वशीला कैधीं गर्भाचे डोहळे देखील झा-

---

समस्त शत्रूंचा.

लेले माझ्या दृष्टी पडले नाहींत, मग प्रसूतीची वार्ता कोठून पण.

आर्या.

काहीं दिवस स्तनमुख, तीचें
आनील, कंकणें शिथिल ॥
झालीं. मुख लवलीफलपांडुर
होतें, तनू अलस अखिल ॥ १ ॥

विदू.-महाराज, तुह्मी मानवांचा धर्म उर्वशीवर मानूं नका. कारण देवांचीं चरित्रें प्रभावानें गूढ असतात.

राजा.-चिंता नाहीं, तूं ह्मणतोस तसें असो, पण मज पाशी तिला गुप्त ठेवण्याचें कारण काय ?

विदू.-दुसरें काहीं नाहीं, तिच्या मनांत कीं, "मी-वृद्ध झाल्यें असें राजाला समजूं नयें, कारण, त्याणें मला टाकलें तर ?

राजा.-आतां थट्टा पुरे. मननकरून पहा, गुप्त ठेवण्याचें कारण काय तें.

---

१ हरपररेवडीच्या फळा सारखें पांडुर.

विदू.-बाबा, देवांची रहस्यें मननानें कोणाला कळ णार आहेत ?

(इतक्यांत कंचुकी येतो).

कंचु.-महाराजांचा जयजयकार असो. महाराज च्यावन ऋषींच्या आश्रमांतून ही तपस्विनी भार्गवी एक मुलगा घेऊन आली आहे, ती आपल्या दर्शनाची इच्छा करित आहे,

राजा.-जा जा, लवकर दोघांस ही आंत घेऊन ये.

कंचु.-आज्ञा महाराज (असें बोलून तापसी सह-वर्तमान कुमारास घेऊन राजा जवळ येतो.

विदू.-ज्याणें आपल्या नखानें चिन्हित अशा बाणा-नें त्या गृध्राचा वेध केला तो हा क्षत्रियाचा कु-मार आहे यांत संशय नाहीं, पहा, हा बहुधा तुझ्या सारखाच दिसत आहे.

राजा.-होय. असं आहे खरें.

श्लोक.

माझी दृष्टि शिशूवरी लगटली
हर्षा शुपूर्णा, मन

आहे पाहुनिया प्रसन्न, शिशुचें
चंद्रा परी आनन ॥
वात्सल्यें हृदय द्रवे, त्यजुनि
मी धैर्य, दृढालिंगन
सर्वांगीं चिरकाल इच्छित असें
घ्याया बहू चुंबन ॥ १ ॥

(जवळ जाउन) मातोश्री, मी चरणा प्रतवंदन करतों

तापसी.-राजा, सोमवंशाचें परिपालन करीत हो-त्सातां चिरायु ऐस. (मनांत) काय चमत्कार! आपला हा औरस पुत्र आहे असें न सांगता ही राजास समजलें. (कुमारास) वत्सा, आ-पल्या वडिलास नमस्कार कर.

कुमार.-(आनंदाश्रु युक्त होऊन अंजलि पुट करून नमस्कार करतो).

राजा-वत्सा, आयुष्मान भव.

कुमार.-(पित्याच्या स्पर्शाचें सुख झाला असें दर्शी-वून मनांत).

श्लोक.

माझा असे जनक हा सुत मी
हि याचा
हें ऐकतांच अनुराग मनांत
साचा ॥
होतो जरी. मगकिती वडिलीं
तयांची
प्रीती असेल, जनकांकिंच वृद्धि
ज्यांची ॥ १ ॥

राजा.-मातोश्री, किन्निमित्त आगमन झालें?

ताप.-ऐकावें महाराज हा दीर्घायु उपजता क्षणींच उर्वशीनें कांहीं कारणास्तव जशी ठेवच असा माझ्या हातीं दिला. तदनंतरच्य वनऋषींनीं कुलीन क्षत्रियाचा जात कर्मादि विधि जसा करावयाचा तसा या मुलाचा केला आणि याला वेदशास्त्रांत निपुण करून आतां धनुर्विद्येंत ही निपुण केलें आहे.

राजा.-आपल्या कृपे करून हा मुलगा सनाथ झाला.

कंचु--असें असें हिकडूय यावे बाई साहेब.

उर्व.(पेऊन आणि पाहून) सोन्याच्या सिंहासनावर बसलेला आणि महाराजच्या शेंडी बांधीत आहेत, असा हा मुलगा कोणाचा बरें ? (तापसी कडे पाहून) सासु बाई, मला सत्यवतीनें सांगितलें होतेंकीं, तुझा मुलगा मोठा झाला आहे, तेंच तर नव्हेनों ?

राजा.-(पाहून) वत्सा,

आर्या.

वत्सा त्वज्जननीही, उत्सुक तु
जला पहावया आली ॥
फुटला स्तनांत पन्हा, चोळीही
खंडशा असे झाली ॥ १ ॥

ताप.-वत्सा, ये, आईला सामोराजा. (असें बोलून कुमारास उर्वशी जवळ नेते)

उर्व--सासूबाई, मी नमस्कार करत्यें.

पात.-वत्से, जन्म सावित्रीहो आणि भर्त्याच्या बहुमानास पात्रहो.

कुमा--आई, मी नमस्कार करितों.

उर्व.-वत्सा, पितृ सेवा परायणहो. (राजास) महाराजाचा जयजयकार असो.

राजा.-पुत्रवतीचें स्वागत असो. यावें येथें बसावें

उर्व.-आर्य जनहो, आपण सर्वांनीं बसावें. (सर्व बसतात)

ताप.-वत्से, ह्या मुलाची विद्या संपूर्ण झाली, आतां हा आयुध आणि कवच धारण करून कोठें ही गेला तरी चिंता नाहीं असा झाला. आज पर्यंत आह्मजवळ ही तुझी ठेवच होती, ती तुझ्या हातीं दिली, आतां मला निरोपदे, कारण आमच्या आश्रम धर्मास येथें अडचणी आहेत.

उर्व.-सासूबाई, बहुता दिवसानीं तुमची भेट झाली आणि हा आतां तुमचा वियोग होत आहे ह्मणून मला फार हुर हूर वाटतें पण तुमच्या धर्मास आड येऊन मी पपांत कशी पडूं? तर मग आतां यावें आणि पुन्हा लवकरभेट द्यावी.

राजा.-मातोश्री, च्यवन ऋषीस माझा साष्टांग प्र-

णाम मागावा.

कुमा--अत्या बाई, खरेंच तुह्मी जाता काय? तर मग मलाही तुमच्या बरोबर घेऊन जा.

राजा.-बाळा, इतके दिवस तूं ब्रह्मचारी होतास, ह्मणून आश्रमांत रहाणें नीटच होतें, पण आतां तुझें लग्न करण्याचा समय आहे.

ताप--मुला, आपल्या पित्याच्या वचनास मान दे.

कुमा--बरें आहे, पण.

श्लोक.

शिखा खाजवीतां सुखाऊन मांडी
वरी माझिया, नीजला जो शिखंडी[1] ॥
मला धाडि खेळावया साठिं, जेव्हां
बहू पुछ विस्तीर्ण होईल तेव्हां ॥ १ ॥

ताप.-बाळा, धाडीन बरें.

उर्व.-सासू बाई, मी नमस्कार करत्यें.

राजा.-मातोश्री, मी चरणाप्रति वंदन करतों.

---

१ मोर.

ताप—तुह्मा सर्वांस माझा आशीर्वाद आहे. (असें बोलून तापसी जाते).

राजा.-(उर्वशीस) सुंदरि,

श्लोक.

तुझ्या ह्या सुपुत्रेंचि मी आज धन्य,
असें सर्व पुत्रां मधें फार मान्य ॥
शचीच्या जयंत जसा मान्य झाला सु
राधीश अत्यंत, लोकत्रयाला ॥ १ ॥

विदू.-तें असो. पण हिच्या नेत्रास अश्रु कां आले बरें ?

राजा.- श्लोक.

लाभें वंशस्थितीच्या, सुदिवस अजि
चा प्राप्त झाला सुखाचा कांते, कांसा
श्रु तूझे नयन ! उतरला वर्ण कांगे ?
मुखाचा ॥ ऐसा आनंद होतां, पृथुकुच
कलशीं हार मुक्ताफलांचा आहे तो अ
श्रूनीं कां द्विगुणित करिशी ? सांग तूं
हेतु याचा ॥ १ ॥

उर्व.—ऐकावें महाराज, प्रथम पुत्राच्या दर्शनानें आनंद युक्त झाल्यें होत्यें पण आतां आपण इंद्राचें नांव काढलें त्यामुळें माझ्या मनांत पूर्वीच्या अवधीचें स्मरण झालें.

राजा-कशाच्या अवधीचें स्मरण झालें ?

उर्व—ऐकावें महाराज पूर्वी इंद्राच्या सभेंत असे झालें कीं, महाराजाकडे माझें मन लागून राहिलें, त्यामुळें मला भान राहिलें नाहीं तेव्हां माझ्या मुखांतून भलतेंच निघालें ह्मणून माझ्या गुरूनीं मला शाप दिला परंतु इंद्रानें मजवर अनुग्रह करून आज्ञा केली.

राजा.-सांग, काय अज्ञा केली ?

उर्व-अशी आज्ञा केलीकीं, जेव्हां माझा प्रिय मित्र जो राजर्षि त्याला तुज पासून पुत्र होईल आणि तो पुत्राचें मुख पाहील तेव्हां त्वां माझ्या जवळ यावें, तदनंतर महाराजांचा वियोग मला लवकर न व्हावा या साटीं च्यवनऋषीच्या आश्रमांत हा मुलगा सत्यवती पाशीं मी ठेविला होता तो आज पित्याची सेवा करण्या जोगा झाला, असें समजून हा दीर्घायु महाराजापाशीं आणिला, आतां आपला आणि माझा सहवास इतकाच.

राजा.-(मूर्छित होऊन पडतो.

सरे.-महाराज, सावधव्हा सावधव्हा.

कंचु--महाराज, सावधव्हा.

विदू.-

राजा.-(सावध होऊन) कशीही दैवगति चमत्कारिक आहे, अंमळ सुखाचें वारें आलेंकीं, दैव आड आलेंच पहा.

साक्या.

तुझिया वियोग दुःखें अजवरि
तळमळलों मी फार ॥
झालों हर्षित सुत मुख पाहुनि
संसाराचें सार ॥ १ ॥
इतुक्या मधेंच वियोग तुजशीं
होत असे मज कैसा ॥
वृष्टीनें गततापा तरुवरि विद्यु
त्पातचि जैसा ॥ २ ॥

विदू.-आतां मला हें मोठें अनर्थाचें चिन्ह दिसत आहे याची निवृत्ति होण्या करितां स्वतःइंद्रा-

कडे जाऊन त्याचा अनुग्रह संपादन करावा हें बरें.

उर्व--हरहर, आतां मी मारल्या पेक्षा मारल्यें गेल्यें. कारण महाराज मनांत असें आणतील कीं, हिला पुत्र झाला आणि तो सुशिक्षित झाला, आतां मजपाशीं हिचें कार्य कांहीं उरलें नाहीं, या मुळेंही स्वर्गास गेली.

राजा.-सुंदरि, असें ह्मणूं नको.

श्लोक.

आहे इष्ट वियोग लब्धचि पर
स्वाधीन जो त्या सदा
चिंताचें पर तंत्रता प्रियकरी ऐ
सें घडेना कदा ॥
स्वामीच्या करिशासनास सुमु
खी, तूं, मीहि आतां वनीं
जातों राज्य सुतांस देउनि, स
खे जेथें मृग स्वावनीं ॥ १ ॥

१ स्वजो आपण त्याच्या रक्षणा विषयीं.

कुमा.-ताता, हत्तीचा भारवत्सावर ठेवणें योग्य नाहीं.

राजा-वत्सा, असें ह्मणू नको.

श्लोक.

गंध द्वीप शिशू असोनि इतरा
हस्ती समागे करी
वीर्योदग्र विषें भुजंग शिशुही
प्राणप्रती संहरी ॥
शक्ती बाळपणांतही नृपतिची भू
रक्षणाला असे
आहे काय वयांत, जाति गुणतो
कार्यी पुढें होतसे ॥ १ ॥

आर्या ताळव्या,

कंचु.-आज्ञा महाराज.

राजा.-पर्वतपंत अमात्यास माझी आज्ञा सांगकीं वत्साच्या राज्या भिषेकाची सज्जना करावी.

कंचु.-(खिन्न होत्सातां जातो).

सर्व.-(अधोमुख होतात).

राजा.-(आकाशाकडे पाहून) कायहो ?. हा अकस्मात् विद्युल्लतांचा पुंज कोठून चमकला ? (पुरतें पाहून) काय ? हे भगवान् नारद मुनि येत आहेत.

श्लोक.

हाये नारद मस्तकीं धरि जटा
गोरोचना पिंगटा
अंगीं मौक्तिककांतिनें तरुणसा,
कैसा दिसे गोमटा ॥
यत्कंठीं उपवीत हें शशिकला
शुभ्र प्रभेनें पहा
जाणो जंगम कल्प वृक्ष अथवा
सौवर्ण अंकुर हा ॥ १ ॥

अरे,- लवकर पूजा साहित्य अणारे पूजा साहित्य.

उर्व.-हें पूजा सहित्य तयार आहे.

नार.-(येऊन) पृथ्वी पतीचा जयजयकार असो.

राजा.-भगवन्, चरणाप्रति वंदन करतो.

१ अंकुर.

उर्व.-मी नमस्कार करत्यें.

नार.-तुह्मा दंपतीचा वियोग नसो.

राजा.-(एकीकडे तोंड करून) असे घडेल काय? (उघड पणानें) मुने हा उर्वशी पुत्र आपणास प्रणाम करित आहे.

नार-हा दीर्घायु असो.

राजा.-मुनिवर्या, हें आसन, ह्यावर बसावें. (स र्व बसतात).

राजा.-(विनयपूर्वक) किन्निमित्त आगमन झालें?

नार.-राजा, इंद्राचा निरोप आहे तो ऐकावा.

राजा.-मुनिवर्या, बोलावें, मी श्रवणत आहें त्पर

नार.-तूं वनांत जाण्याचा निश्चय केला हें स्वप्रभावानें जाणून इंद्र तुला आज्ञा करीत आहे.

राजा.-काय आज्ञा करीत आहे?

नार.-त्रैलोक्यांतील भूत भविष्य जाणणारे जे मुनी त्याणीं असें सांगीतलें आहेकीं, देव आणि दैत्य यांचा दारुण संग्राम होणार आहे आणि

तूं रणशूर असून इंद्रास सहाय होणारा आहेस या करितां त्वां शस्त्रत्याग न करावा आणि या वदा युष्पही उर्वशी तुझ्या सहवर्तमान धर्माचरणार्थ तुझ्या जवळ असो.

उर्व.-अहाहा, काय सांगावें बाई आश्चर्य ? जसें कां ह्रदयांतून शल्यच उपटून काढावें असें झालें.

राजा.-मजवर परमेश्वराचा हा मोटा अनुग्रह झाला.

नार.-राजा, झालें हें योग्यच आहे.

श्लोक.

तुझें करी कार्य सदा पुरंदर ॥
तदिष्ट तूं ही करिशी धुरंधर ॥
रवी स्वतेजें करि अग्नि वृद्धितें।
अग्नी रवीच्या करितो समृद्धितें ॥ १ ॥

(आकाशाकडे पाहून) रंभे, कुमाराच्या अभिषेकाची तयारी कर.

रंभा.-(येऊन) ही अभिषेकाची सामग्री तयार आहे.

नार--ह्या राज कुमारास सिंहासनावर बसवावें.

रंभा--(कुमारास सिंहासनावर बसविते).

नार.-राजपुत्रा, तुझें कल्याण असो.

राजा.-वत्सा, वंशाची वृद्धि करणारा रहो.

उर्व.-बाळा, तुझ्या पित्याचे आशीर्वाद सफळ होवोत.

(पडद्यांत दोघे स्तुतिपाठक येतात).

श्लोक.

स्त्रष्ट्या पासुनि अत्रिदेव मुनि
सा, त्याचा सुधांशूजसा
त्या पासूनि जसा असे बुध, त
या पासूनि हा भूपसा ॥
तूंही सर्व गुणें पित्यासम, तु-
झ्या वंशींच लोकोतरीं
आशीर्वाद समाप्त सर्व अमुचे
झाले, जगाभीतरीं ॥ १ ॥

द्वितीया श्लोक.

प्रेमंत्वज्जनकीं असे प्रथमजी
ती राज्य लक्ष्मी महा
धैर्या सुस्थिरला तुला भजुनिया
अत्यंत शोभे पहा ॥
पूर्वी जेवि हिमाचलीं उपजुनी
येतां समुद्रा प्रती
गंगा तुल्यविभक्त नीर असतां
जैशी बहू शोभती ॥ १ ॥

रंभा.-आज माझ्या सखीला आपल्या पुत्राची यौवराज्याची श्री पाहून भर्त्याच्या विरहाची विस्मृति होत आहे ही मोठी दैवाची गोष्ट आहे.

उर्व.-आमचें दोघांचें ही दैव सारखेंच आहे. (कुमाराचा हात धरून) वत्सा, ज्येष्ठ मातेला नमस्कारकर.

राजा.-वत्सा, थांब, आपण दोघे बरोबरच तिच्या जवळ जाऊं.

नार- आर्या.

त्वत्पुत्र आयु याची, राज्यश्री

पाहतांचि तें स्मरलें ॥
मजला, गुहास इंद्रें, सुरसेनेचें
पतित्व जें दिधलें ॥ १ ॥

राजा.--मुनिवर्या, इंद्रानें मजवर मोठा अनुग्रह केला

नार.-राजा, इंद्रानें तुझें आणखी प्रिय काय करावें

राजा.-मुनिवर्या, याहून आणखी प्रिय करावयाचें काय उरलें आहे ? तथापि मजवर इंद्र प्रसन्न आहे तर त्याणें हें करावें.

श्लोक.

श्रीअसे जिथें तिथें कधीं नसे
सरस्वती
हा विरोध दोघिचा निसर्ग सि
द्ध बोलती ॥
जे सविद्य ते असोत सर्वकाळ
ही धनी
होत सर्व सौख्यपात्र तुष्टिपुष्टि
नीजनी ॥ १ ॥

अणखी--- आर्या.

संकट तरोत सारे, सर्वहि क
ल्याण लोक पावोत ॥
आनंदहो समस्तां, सारे जन
पूर्णकाम होवोत ॥ १ ॥

(असें बोलून जातात).

(पाचवा अंकसमाप्त).

आर्या.

संस्कृत नाटक लोकीं, आहे जें
विक्रमोर्वशी नामें ॥
त्याचें भाषांतर हें, केलें विद्व
त्प्रसादधनकामें ॥ १ ॥
माझी कृतिही केवळ, आहे ज
रि पोरखेळ तरि मान्य ॥
गुरुजन करतिल, कां तरि, शि
शुची आवड तया असामान्य २
अज्ञानगदविनाशक, सुखकर
पंडित समग्र मजला हे ॥
त्यांच्या परी क्षणानें, आरोग्या
परिमती समजं लाहे ॥ ३ ॥
क्षारोदक मेघमुखीं, पडतां बहु
गोड होतसे साच ॥
माझा ग्रंथहि विद्वन्मुखसंपर्कें
असो प्रिय तसाचा ॥ १ ॥

श्लोक,

कृष्ण शास्त्री राजवाडे, ह्यांणीं
रचुनि नाटक ॥

अरंग आर्पेलें विद्वद्रंगीं हे होउ
हाटक ॥ १ ॥

विक्रमोर्वशी नाटक समाप्त.